# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १५८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## मंगळवार, दि.२६ जून, २०२३ सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १५८ वी बैठक **सोमवार, दि.२६ जून, २०२३ रोजी सकाळी ११:०० वा.** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस सदस्य हे उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) राजनीश कामत, प्रभारी कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, प्र-कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्या | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | ईमेलद्वारे विनंतीनुसार अनुपस्थित |
| १८) | डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | उपस्थित |
| १९) | मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे - कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. प्रभारी कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. अजित माधव पाटणकर यांनी ई-मेलद्वारे अनुपस्थिती कळविली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| ०१ | १) दि. १९ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५६ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि. २४ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br><br>कुलसचिव यांनी दि.१९ मे, एप्रिल, २०२३ व दि.२४ मे, २०२३ रोजी झालेल्या तातडीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.१९ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५६ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांत मान्य करण्यात आला.<br>२) दि.२४ मे, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १५७ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांत मान्य करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | **विद्यापीठ परिसरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसचा भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्याची बाब पुर्नविचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरामध्ये सामाजिकशास्त्र संकुलामध्ये दि.२५/०३/२०१३ पासून पोस्ट ऑफिस कार्यरत आहे. विद्यापीठ परिसरामध्ये पोस्ट ऑफिस सुरु करण्याबाबत दि.०४/०३/२०१३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र.२० अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन निर्णय क्रमांक एसयुएस-२०१३/प्र.क्र.९९/विशि-२, दि.१८/०९/२०१४ अन्वये महाराष्ट्र शासनाने शासन निर्णयान्वये विद्यापीठाच्या मालकीची अंदाजे ३०० चौ. फुट जागा पोस्ट ऑफिस सुरु करण्यासाठी रुपये २१/- (अक्षरी रुपये एकवीस रुपये फक्त) दरमहा याप्रमाणे १० वर्षाकरिता भाडेतत्वावर पूर्वलक्ष्मी प्रभावाने (दि.२५-०३-२०१३) देण्यास विद्यापीठाच्या प्रस्तावास शासनाने कार्योत्तर दिलेली आहे. त्यानुसार दि.३०/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर मंडल सोलापूर यांच्यासोबत दि.२५/०३/२०१३ ते दि.२४/०३/२०२३ पर्यंत (Lease Agreement) करार करण्यात आला आहे.<br>मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी दि.०८/०८/२०१३ रोजीच्या पत्रान्वये पोस्ट ऑफिसचा करार दि.२४/०३/२०२३ रोजी संपणार असून त्याचे नुतणीकरण (२५/०३/२०२३ पासून) पुढील दहा वर्षासाठी करण्याबाबत कार्यवाही करावी आणि तसे या कार्यालयास उलट टपाली कळवावे असे नमूद केलेले आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये भाडे कराराबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहेत.<br>१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ८ "राज्य शासनाचे विद्यापीठावर नियंत्रण" उपकलम (ड) नुसार विद्यापीठाची कोणतीही जागा भाडेतत्वावर देणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>**"स्थावर मालमत्तेची विक्री भाडेपट्टा याद्वारे, हस्तांतरण करणार नाही"**<br>२) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१ "व्यवस्थापन परिषदेचे अधिकार व कर्तव्ये" उपकलम (ड) नुसार विद्यापीठाची कोणतीही जागा भाडेतत्वावर देणेबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.<br>**"राज्य शासनाच्या पूर्व परवानगीने कोणतीही स्थावर मालमत्ता, इतर संघटनेकडे विक्रीद्वारे किंवा भाडेपट्ट्याने किंवा कराराने हस्तांतरीत करणे"**<br>**"परंतु, विद्यापीठाची उद्दिष्टे साध्य करण्याकरिता कोणत्याही आवश्यक भौतिक सुविधा पुरविण्याच्या प्रयोजनार्थ, बँक, उपाहारगृहे, डाकघर, मोबाईल टॉवर, इत्यादीसारख्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचा राज्य शासनाच्या पूर्व-मान्यतेशिवाय विशिष्ट कालावधिकरीता वापर करण्याची परवानगी असेल" असे नमूद केलेले आहे.** | अभियांत्रिकी विभाग |

| | | |
|---|---|---|
| | त्यानुसार विद्यापीठाकडील पोस्ट ऑफिसच्या भाडेकराराच्या नुतनीकरणचा प्रस्ताव दि.०७ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर केले असता, व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव क्र.१९(१०) अन्वये ठराव केलेला आहे. | |
| | ठराव: सदरबाबत सखोल चर्चा करण्यात आली, चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, सद्य:स्थितीत विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभाग व संकुलाची संख्या वाढलेली असल्याने त्यांना जागेची कमतरता भासत आहे. यास्तव, अंतिमत: सर्वानुमते असे ठरले की, विद्यापीठाकडील पोस्ट ऑफिससाठी दिलेल्या जागेबाबतचा पुढील भाडेपट्टा कराराचे नुतनीकरणाचा प्रस्ताव नाकारण्यात यावा. | |
| | त्यानुसार वरीलप्रमाणे झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर यांना दि.१३/१२/२०२२ च्या पत्रान्वये विद्यापीठ परिसरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसच्या भाडेपट्टा कराराचे नुतनीकरणचा प्रस्ताव रद्द करण्यात येत असल्याचे कळविले आहे.<br>वरील पत्राच्या अनुषंगाने मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर यांनी दि.२४/०२/२०२३ रोजी विद्यापीठ कार्यालयाकडे दिलेल्या पत्रामध्ये **अ ते ई** पर्यंतचे मुद्दे विचारात घेवून विद्यापीठाकडील पोस्ट ऑफिसच्या भाडेपट्टा कराराच्या नुतनीकरणाचा रद्द करण्यात आलेल्या निर्णयाचा पुर्नविचार व्हावा आणि तसे या कार्यालयास उलट टपाली कळवावे अशी विनंती केलेली आहे.<br>पोस्ट ऑफिसची मुलभूत सुविधा असल्याकारणाने ते विद्यापीठात असणे गरजेचे आहे. असे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे.<br>सबब, मा. प्रवर अधिक्षक डाकघर, सोलापूर यांचे विद्यापीठ परिसरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसचा भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्याची बाब पुर्नविचारार्थ. | |
| ठराव: | **विद्यापीठ परिसरामध्ये असलेल्या पोस्ट ऑफिसचा भाडेपट्टा कराराचे नुतनीकरण करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | M.TECH (Cosmetic Technology) Sem-X या पदव्युत्तर कोर्सच्या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क रु.१,४२०/- परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात M. TECh (Cosmetic Technology) पदव्युत्तर कोर्सचा अभ्यासक्रम सुरु झालेला आहे. सदर कोर्सच्या Sem-I to IX साठी परीक्षा शुल्क रु.१,४२०/- अशी आकारली जात आहे.<br>परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.१९/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत M. TECH (Cosmetic Technology) Sem-I to IX प्रमाणे Sem- X साठी परीक्षा शुल्क रु.१,४२०/- अशी आकारण्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाने सर्वानुमते स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.<br>सबब, M. TECH (Cosmetic Technology) Sem-X या पदव्युत्तर कोर्सच्या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क रु.१,४२०/- परीक्षा व मूल्यमापन मंडळाने स्विकारुन व्यवस्थापन परिषदेकडे केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | M.TECH (Cosmetic Technology) Sem-X या पदव्युत्तर कोर्सच्या अभ्यासक्रमाचे परीक्षा शुल्क रु.१,४२०/- परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **संगणक परीक्षा विभागास आवश्यक असलेले Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा दि.१०/०६/२०२३ रोजी संपत असल्याने मे. ईएसडीएस सॉफटवेअर प्रा.लि. नाशिक यांना तीन महिन्याकरीता मुदत वाढ देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा विभागाकडील संगणक या विभागास आवश्यक Examination Processing Updated Web Version Software प्रणाली करीता Data Center (Providing Services On Hiring Basis) मासिक भाडेतत्वावर घेण्याकरीता मे. ईएसडीएस सॉफटवेअर प्रा. लि. नाशिक या फर्मसोबत दरकरार करण्यात आला होता. सदर फर्मसोबत केलेल्या दरकरारानुसार दि.१०/०६/२०२३ रोजी कराराचा कालावधी संपणार आहे.<br>सबब, Examination Processing Updated Web Version Software प्रणाली करीता Data Center (Providing Services On Hiring Basis) मासिक भाडेतत्वावर घेण्यासाठी नव्याने ई-निविदा/ दरपत्रकची मागविणे गरजेचे असून ई-निविदेची प्रक्रिया करण्यासाठी दोन ते तीन महिन्याचा कालावधी लागणार आहे. दरम्यानच्या कालावधीत Data Center ची सेवा बंद होऊ नये म्हणून Examination Processing Updated Web Version Software प्रणाली करीता Data Center (Providing Services On Hiring Basis) चालु दरकरारानुसार मासिक भाडेतत्वावर घेण्यासाठी तीन महिन्याकरीता खर्च रु.१,००,२६२.३१ (प्रति तीन महिना जीएसटी सह) इतका होणार असून सदर कामासाठी होणारा खर्च विभागाकडील Data Center Rant या अंदाजपत्रकिय शिर्षकामधून खर्ची टाकावा लागणार आहे.<br>तरी संगणक परीक्षा विभागास आवश्यक असलेले Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा दि.१०/०६/२०२३ रोजी संपत असल्याने मे. ईएसडीएस सॉफटवेअर प्रा. लि. नाशिक यांना दि.११/०६/२०२३ पासून तीन महिन्याकरीता मुदत वाढ देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग (भांडार) |
| ठराव: | **संगणक परीक्षा विभागास आवश्यक असलेले Data Center (Providing Services On Hiring Basis) ची सेवा दि.१०/०६/२०२३ रोजी संपत असल्याने मे. ईएसडीएस सॉफ्टवेअर प्रा.लि., नाशिक यांना तीन महिन्याकरीता मुदत वाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच तीन महिन्याच्या आत विद्यापीठाच्या सर्व्हरवर असलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा डेटा मायग्रेशन ट्रान्सफर करुन घेण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ नग हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ या शास्त्रीय उपकरणाची आवश्यकता आहे.<br>सदर शास्त्रीय उपकरण खरेदी करण्यास अंदाजे खर्च रु.८,००,०००/- इतका अपेक्षित असून सदरचा खर्च संकुलाकडील Development Budget Part-II या अंदाजपत्रकीय शिर्षकाच्या तरतूदीतून होणार आहे. याकरिता मा. कुलगुरुमहोदय यांच्या मान्यतेसाठी दि.३१/०५/२०२३ रोजी टिपणी सादर केली असता, सदर टिपणीवर मा. कुलगुरुमहोदय यांनी Development Budget Part - II या अंदाजपत्रकीय खरेदीबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत.<br>सबब, रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ नग हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्याची बाब विचारार्थ. | रसायनशास्त्र संकुल |
| ठराव: | **रसायनशास्त्र संकुलाकडील संशोधन कामाकरिता व एम. एस्सी. भाग-२ च्या प्रकल्प कामाकरिता Electro-Chemical Workstation - ०१ नग हे शास्त्रीय उपकरण खरेदी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तथापि, सदरचे उपकरण वापरुन प्रकाशित होणारे शोधनिबंध विद्यापीठास माहितीस्तव सादर करावे व एक वर्षानंतर किती संशोधन झाले याचा अहवाल व्यवस्थापन परिषदेला द्यावा.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | दि.०५/०६/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०५/०६/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.<br>टिपणी: दि.०५/०६/२०२३ रोजी झालेल्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो General Statute No. S. ३२४ नुसार वित्त व लेखा समितीची व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. दि.०५/०६/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेला दि.१९/०५/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत माहितीस्तव. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | दि.०५/०६/२०२३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीने शिफारस केलेली दि.०५/०६/२०२३ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहास "राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन परिषद सभागृह" असे नाव देण्याबाबत अधिसभेनी केलेली शिफारस विचारार्थ.**<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या "विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहास "राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन परिषद सभागृह" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभेनी व्यवस्थापन परिषदेस करित आहे असा ठराव अधिसभा सदस्य ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी दि.१४ मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीत सादर केला होता. सदर बाबत दि.१४ मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.९ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.<br><br>ठरावः सदरचा प्रस्ताव ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी मांडल्यानंतर त्यास श्रीमती वैशाली जितेंद्र साठे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.<br><br>सबब, उपरोक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सभागृहास "राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन परिषद सभागृह" असे नाव देण्याबाबत अधिसभेनी केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठरावः | **प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहास "राष्ट्रमाता जिजाऊ व्यवस्थापन परिषद सभागृह" असे नाव देण्याबाबत अधिसभेनी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८ ] | **महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७ मार्च, २०२३ मधील तरतूदीनुसार विद्यापीठ परिसर संकुलातील संबंधित संचालकांमार्फत नेमण्यात येणाऱ्या अभ्यागत/ तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सुधारित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसर संकुलात तासिका तत्वावर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात वाढ करणे बाबत प्रस्तुत कार्यालयाकडून दि.२५/०५/२०२३ रोजी सादरीकरण करण्यात आले होते. त्यात नमूद करण्यात आले होते की, दि.१६/०५/२०२३ रोजी विद्यापीठ परिसर संकुलातील संचालकांमार्फत नेमण्यात येणाऱ्या तासिका तत्वावरील शिक्षकांना (C.H.B.) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सैध्दांतिक प्रतितास व प्रात्यक्षिके प्रतितास किती मानधन द्यावे आणि सदरची बाब आगामी होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवणे संदर्भात मा. प्रभारी कुलगुरु महोदयांनी खालीलप्रमाणे पृष्ठांकन केले आहे.<br>"ई च्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाचा GR विद्यापीठाने स्वीकारला आहे का? याची स्पष्टता करावी तसेच शासनाचे कोणते GR स्वीकारले आहेत (वेतनासंबंधी) याचा पण उल्लेख करावा."<br>यास अनुसरुन तासिका तत्वावरील शिक्षकांच्या मानधनासंबंधी व नियमित शिक्षकांच्या वेतनासंबंधीचा थोडक्यात घटनाक्रम खालीलप्रमाणे:<br>१) तासिका तत्वावरील (C.H.B) शिक्षकांच्या मानधनासंबंधी:<br>पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर शासनाने दि. १४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/ (१८५/१८)/मशि-३ नुसार सुधारित केले आहेत. सुधारित दराचे मानधन नमूद करुन, दि.११ मार्च २०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय ठेवला असता, सदर विषयावर व्यवस्थापन परिषदेने खालीलप्रमाणे ठराव पारित केला आहे.<br>ठराव: पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्यात आल्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा दि.१४ नोव्हेंबर, २०१८ रोजीच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली. तद्नंतर या ठरावाच्या अनुषंगाने दि.१४/०८/२०१९ रोजी सादरीकरण करण्यात येवून यात प्रामुख्याने खालील मुद्दे नमूद करण्यात आले होते.<br>१) दि.१४ नोव्हेंबर, २०१८ च्या शासन निर्णयानुसार पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता सैध्दांतिक प्रतितास रु.६००/- मानधन आदा करण्याची विशद केली आहे. | आस्थापना विभाग |

२) C.H.B तत्वावर नियुक्त करण्यात येणाऱ्या शिक्षकास प्रतितास रु.५००/- किंवा रु.६००/- यापैकी किती मानधन आदा करावे याबाबत आदेश व्हावेत.

यासादरीकरणाचे अवलोकन करुन तत्कालीन मा. कुलगुरु महोदयांनी रु.५००/- प्रमाणे प्रतितास C.H.B. शिक्षकांना मानधन आदा करावे असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे आजतागायत रु.५००/- मानधन आदा करण्यात येते.

३) वेतनासंबंधी स्वीकारलेल्या GR बाबत:

विद्यापीठ परिसर ०५ अनुदानित संकुलात कार्यरत असलेल्या नियमित शिक्षकांसाठी महाराष्ट्र शासनाच्या दि.०८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयानुसार सातव्या वेतनआयोगा प्रमाणे वेतननिश्चिती करुन व सदर वेतननिश्चिती मा. विभागीय सहसंचालक, सोलापूर आणि मा. वरिष्ठ लेखाधिकारी, सोलापूर यांचेकडून प्रमाणित होवून मिळाल्यानंतर सातव्या वेतन आयोगानुसार माहे वेतन आदा करण्यात येते. तर कंत्राटी शिक्षकांना SET/NET/Ph.D धारक यांना माहे एकत्रित वेतन रु.२२,०००/- तर SET/NET/Ph.D अर्हता न धारण करणारे शिक्षक यांना माहे एकत्रित वेतन रु.१८,०००/- व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठरावानुसार आदा करण्यात येते. तसेच दि.१३ एप्रिल, २०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र. ११ (०२) वर पारित झालेल्या ठरावानुसार शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून SET/NET/GPAT/Ph.D. ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या कंत्राटी शिक्षकास माहे एकत्रित वेतन रु.३०,०००/- तर SET/NET/GPAT/ Ph.D. अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकास माहे वेतन रु.२५,०००/- देण्यात येणार आहे.

सबब, दि.२७ मार्च, २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यापीठ परिसर सर्व संकुलातील कला वाणिज्य व विज्ञान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत/तासिका तत्वावरील संबंधित संचालकांमार्फत नेमण्यात येणाऱ्या अध्यापकांना सैध्दांतिक प्रतितास रु.१,०००/- तर प्रात्यक्षिके प्रतितास रु.४५०/- प्रमाणे सुधारित मानधन लागू करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. अर्थसं-२०२२/ प्र.क्र.१०५/(१)/मशि-३, दि.२७ मार्च, २०२३ मधील तरतूदीनुसार विद्यापीठ परिसर सर्व संकुलातील कला, वाणिज्य व विज्ञान पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यागत/तासिका तत्वावरील संबंधित संचालकांमार्फत नेमण्यात येणाऱ्या अध्यापकांना सैध्दांतिक प्रती तास रु.१,०००/- तर प्रात्यक्षिके प्रती तास रु.४५०/- प्रमाणे सुधारित मानधन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०९] | **दि. ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. २२ वर पारित झालेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत Teaching learning Center सुरु करण्यासाठी केंद्र सरकारकडे सर्वकष प्रस्ताव सादर करणेकामी, तो प्रस्ताव तयार करणेसाठी समिती गठीत होऊन मिळण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत ठराव मांडण्यासाठी अधिसभा सदस्य डॉ. जैनोद्दीन मुल्ला यांनी आपली सूचना पाठविली होती. त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>"प्रस्तुत विद्यापीठामध्ये शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत Teaching learning Center सुरु करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव सादर करावा अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे" सदर ठरावास अधिसभा सदस्य डॉ. विरभद्र दंडे यांनी अनुमोदन दिले.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ३०(१) अन्वये व्यवस्थापन परिषद, विद्यापीठाचे मुख्य कार्यकारी व धोरण आखणारे प्रमुख प्राधिकरण असेल आणि विद्यापीठाचे कामकाज चालविण्याकरिता जबाबदार असेल आणि ती अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे विनिर्देशपूर्वक नेमून दिली नसतील अशी कर्तव्ये पार पाडील. अशी तरतूद आहे.<br>सबब, सदर तरतूदीनुसार शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे Teaching learning Center चा प्रस्ताव पाठविण्यासाठी त्याकामी सर्वकष प्रस्ताव तयार करणेसाठी तज्ञसमितीचे नामनिर्देशन होऊन मिळणेची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **दि. ०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. २२ वर पारित झालेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठामध्ये शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांचेमार्फत Teaching learning Center सुरु करण्यासाठी केंद्र सरकारकडे सर्वकष प्रस्ताव सादर करणेकामी, तो प्रस्ताव तयार करणेसाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.** | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>(प्रभारी अधिष्ठाता - विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा) | सदस्य |
| ३) | डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>(प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा) | सदस्य |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>(प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा) | सदस्य |
| ५) | डॉ. राजशेखर हिरेमठ<br>(प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा) | सदस्य |
| ६) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ७) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य |
| ८) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या |
| ९) | डॉ. प्रशांत मारुती पवार<br>(अध्यक्ष - सिव्हील इंजिनिअरींग अभ्यासमंडळ) | सदस्य |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १० ] | **दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १८ वर पारित झालेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठातील कायम आस्थापनेवरील १००% शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी महाराष्ट्र शासनास प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १८ अधिसभा सदस्य डॉ. शिरीष नागनाथ भोसले यांनी महाराष्ट्र शासनाने १००% शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरावीत अशी विनंती शासनास करण्याची शिफारस ही अधिसभा, व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषद यांचेकडे करीत आहे अशी सूचना पाठविली होती.<br>सदरचा प्रस्ताव मांडल्यानंतर त्यास अधिसभा सदस्य डॉ. जैनोद्दीन मुल्ला यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमतें व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात आली. असा ठराव पारित करण्यात आला आहे.<br>याबाबत सादर करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ३३ अन्वये विद्यापरिषदेचे अधिकार व कर्तव्य नमुद करण्यात आले आहे. त्यात शासनाने मंजूर केलेले शिक्षक व शिक्षकेत्तर अधिकारी व कर्मचारी भरती व तत्सम अधिकारा संबंधी प्रयोजन नसल्याने, सदरचा विषय प्रशासकीयदृष्टया धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यात येत आहे.<br>राज्यशासनाने प्रस्तुत विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुल, पदार्थविज्ञान संकुल, भूशास्त्र संकुल, सामाजिकशास्त्रे संकुल आणि संगणकशास्त्र संकुल या पाच (०५) अनुदानित संकुलांसाठी प्राध्यापक-०५, सहयोगी प्राध्यापक-१० आणि सहाय्यक प्राध्यापक-२२ अशी एकूण ३७ शिक्षकीय पदे मंजूर केली आहेत. सद्य:स्थितीत २१ शिक्षकीय पदे कार्यरत असून, १६ पदे रिक्त आहेत. त्यापैकी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/प्र. क्र. १६६-अ/१७ / विशि-१, दि. १६/११/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास रिक्त १६ पदांपैकी, ०७ पदे भरण्यास परवानगी दिली आहे. | आस्थापना विभाग |

तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास शासनाने २१० शिक्षकेत्तर पदांचा आकृतीबंध मंजूर केला आहे. रिक्त शिक्षकेत्तर पदांचे विवरण खालीलप्रमाणे:

| अ.क्र. | पदांचे विवरण | रिक्त पदसंख्या |
|---|---|---|
| १. | सिस्टीम ॲनालिस्ट | ०१ |
| २. | सहाय्यक कुलसचिव | ०२ |
| ३. | कक्ष अधिकारी | ०२ |
| ४. | प्रोग्रामर | ०१ |
| ५. | वरिष्ठ ग्रंथालय सहाय्यक | ०२ |
| ६. | भांडारपाल | ०३ |
| ७. | लघुटंकलेखक | ०३ |
| ८. | प्रयोगशाळा सहाय्यक | ०४ |
| ९. | प्रयोगशाळा परिचर | ०३ |
| १०. | वाहन चालक | ०१ |
| ११. | शिपाई | ११ |
| १२. | स्वच्छक | ०१ |
| एकूण | | ३४ |

सबब, अधिसभेने शिफारस केल्यानुसार एकूण उर्वरित रिक्त शिक्षकीय ०९ पदे आणि शिक्षकेत्तर ३४ रिक्त पदे भरणेसंदर्भात महाराष्ट्र शासनास प्रस्ताव पाठविण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** दि.०४ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १८ वर पारित झालेल्या ठरावानुसार प्रस्तुत विद्यापीठातील कायम आस्थापनेवरील १००% शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यास मंजुरी मिळणेबाबत महाराष्ट्र शासनास प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ११ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ वर्धापनदिनाचे औचित्य साधून दरवर्षी दि. ०१ ऑगस्ट या दिवशी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०१९ पूर्वी विद्यापीठ संकुल परिसर व महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्याकरीता स्वतंत्र पुरस्कार प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, २०१९ साली विद्यापीठ वर्धापन दिन पुरस्कार नियमावलीबाबत फेरविचार करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत त्रिसदस्यीय पुरस्कार फेरविचार समिती गठित करण्यात आली होती.<br>सदरील समितीद्वारे अभ्यास व चिंतन करुन सदर वर्धापन दिन पुरस्काराबाबतीत एका जिल्हयाचे कार्यक्षेत्र विचारात घेता शहरी व ग्रामीण असे पुरस्काराचे स्वरुप बदलून ते सर्वसमावेशक करुन शहरी, ग्रामीण, विद्यापीठ व महाविद्यालय असा फरक न करता विविध पुरस्कारासाठी आर्दश नियमावली तयार केलेली आहे. त्यानुसार प्रतीवर्षी वर्धापन दिन पुरस्कार प्रदान करण्यात येतात.<br>तथापि, कॉलेज कर्मचारी युनियन, जिल्हा सोलापूर या संघटनेने त्यांच्या दि.३०/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये, "प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रतिवर्षी शिक्षकांबरोबरच गुणवंत शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार दिला जातो. एक वर्ष आड महाविद्यालय व विद्यापीठ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास हा पुरस्कार दिला जातो. गतवर्षी विद्यापीठ कर्मचाऱ्यास हा पुरस्कार दिला आहे. यंदा महाविद्यालयीन कर्मचाऱ्याचा नंबर लागतो. विद्यापीठापेक्षा महाविद्यालय शिक्षकेत्तर कर्मचारी पाच पट जास्त आहेत. त्यामुळे हा पुरस्कार प्रतिवर्षी विद्यापीठ व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे देण्यात यावा," अशी विनंती केली आहे.<br>तसेच यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, सोलापूर यांनी त्यांच्या दि. २७ जून, २०२२ रोजीच्या पत्रान्वये संघटनेने महाविद्यालय व विद्यापीठीय कर्मचारी असे एकत्रित पुरस्कार देण्याऐवजी विद्यापीठ प्रशासनातर्फे विद्यापीठातील कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र गुणवंत कर्मचारी पुरस्कार देण्याबाबत विनंती केली आहे.<br>उपरोक्तप्रमाणे संघटनांकडून करण्यात आलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्याची बाब विचारार्थ. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर या महाविद्यालयाने सन २००७-०८ ते २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमाकरिता विद्यापीठाचे संलग्निकरण न घेताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदर महाविद्यालयावर विद्यापीठ दंडक O.४४ (iii) नूसार दंडात्मक कारवाई करण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा या महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००६-०७ पासून शासनाची व विद्यापीठाची मान्यता प्राप्त झाली होती. परंतु सदर अभ्यासक्रमास आवश्यक असणारी विद्यार्थी संख्या उपलब्ध होत नसल्याचे कारण प्रस्तावात नमूद करुन संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ पासून सदर अभ्यासक्रम बंद करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रस्तावासंदर्भात डॉ. एन. बी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठास सादर केला असून, अहवालात समितीने एम. ए. (इंग्रजी) हा पदव्युत्तर अभ्यासक्रम बंद करण्याची शिफारस केलेली आहे.

दरम्यानच्या कालावधीत कार्यवाही सुरु असतांना महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे हित व पालकांची मागणी विचारात घेवून एम. ए. मराठी व हिंदी हे अभ्यासक्रम बंद करण्याबावत सादर केलेल्या प्रस्तावांवरील पुढील कार्यवाही स्थगित करुन सदर अभ्यासक्रम पुनःश्च चालु करण्याबाबतची कार्यवाही करण्याविषयी विनंती केलेली होती.

सदर प्रकरणी कार्यवाही सुरु असताना मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार सर्वच पदव्युत्तर अभ्यासक्रमाची माहिती महाविद्यालयाकडून मागवून घेण्यात आली होती. त्यासअनुसरुन महाविद्यालयाने सादर केलेली माहिती लक्षात घेता, महाविद्यालयाने एम. ए. (इंग्रजी) भाग २ चा नैसर्गिक विस्तार न करताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याचे व सदर विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २००७-०८ मध्ये संलग्निकरण नसतानाही परीक्षा दिल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून आले.

महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० पर्यंत एकूण ४९ विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे संलग्निकरण न घेता खालीलप्रमाणे प्रवेश दिल्याचे उपलब्ध अभिलेखावरुन दिसून येते.

| अ.क्र. | शैक्षणिक वर्ष | एम. ए. इंग्रजी भाग १ प्रवेशित विद्यार्थी संख्या | एम. ए. इंग्रजी भाग २ प्रवेशित विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|
| १ | २००७-०८ | १२ | ०६ | |
| २ | २००८-०९ | ०० | १८ | |
| ३ | २००९-१० | १३ | ०० | |
| | एकूण | २५ | २४ | = ४९ |

सदर महाविद्यालयातील एम. ए. (इंग्रजी) या अभ्यासक्रमास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ नुसार विद्यापीठाने मान्यता दिलेली आहे. सद्य:स्थितीत

महाराष्ट्र शासनाने दि. २३ फेब्रुवारी, २०१७ च्या महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - ब अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ हे दि. ०१ मार्च, २०१७ पासून अंमलात आणले आहे. यास्तव सदर अधिनियम विद्यापीठास लागू आहेत. त्याचप्रमाणे शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा व अतिरिक्त तुकडी संदर्भात कार्यवाही करणेकामी कार्यप्रणाली निश्चित केलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ (१) (ग) मध्ये "अभ्यास पाठयक्रमासाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या विद्यापीठाद्वारे आणि राज्य शासनाद्वारे वेळोवेळी, विहित केलेल्या मर्यादेपेक्षा अधिक नसेल" अशी तरतूद नमूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (५) नुसार "विद्यापीठाकडून उच्च शिक्षणाचे महाविद्यालय किंवा परिसंस्था किंवा नवीन अभ्यास पाठयक्रम, विषय, विद्याशाखा वा अतिरिक्त तुकडी यांच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आल्याशिवाय कोणत्याही विद्यार्थ्याला महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत प्रवेश देण्यात येणार नाही" अशी तरतूद आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०८ (१) (ग) व कलम ११० (५) विचारात घेता, जर एखाद्या महाविद्यालयाने त्यांच्याकडील कोणत्याही अभ्यासक्रमाला मूळ प्रवेशक्षमतेपेक्षा जास्त किंवा विद्यापीठाचे संलग्निकरण न घेता विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर दंडक ४४ अन्वये संबंधित महाविद्यालयाला आर्थिक दंड करण्याची तरतूद आहे. (सोबत दंडकाची छायांकित प्रत जोडली आहे.)

विद्यापीठ दंडक O.४४ (iii) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"A fine not less than the amount of annual tuition fees and not more than ten times the annual tuition fees per student, for students admitted in excess of the permitted strength for course/division or for admitting students in violation of the rules of admission."

सबब, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर या महाविद्यालयाने सन २००७-०८ ते २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमाकरिता विद्यापीठाचे संलग्निकरण न घेताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदर महाविद्यालयावर विद्यापीठ दंडक O.४४ (iii) नूसार दंडात्मक कारवाई करण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, करमाळा, जि. सोलापूर या महाविद्यालयाने सन २००७-०८ ते २००९-१० या शैक्षणिक वर्षामध्ये एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमाकरिता विद्यापीठाचे संलग्निकरण न घेताच विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला असल्याने सदरची कार्यवाही २००७-०८ ते २००९-१० या कालावधीतील असल्याने तत्कालीन विद्यापीठ कायद्यातील झालेले बदल हे पूर्वलक्षीप्रभावाने लागू करता येत नाही त्यामुळे सदर महाविद्यालयावर विद्यापीठ दंडक O.४४ (iii) नुसार दंडात्मक कारवाई करु नये असे सर्वानुमते ठरले.**

**तसेच प्रशासकीय स्तरावर इतर बाबी ठरविण्याचे अधिकार व संलग्निकरण देण्याचे ठरले.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **शासनाने दि. १६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी विद्यापीठाने गठित केलेल्या अभ्यास समितीचा प्रारुप अंतिम करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने दुरुस्तीसह मान्य करुन विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे. त्याअनुरोधाने विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या दि.१६/०१/२०२३ रोजीच्या शासन पत्राच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी अभ्यास समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या निर्देशानुसार व शासनाने वेळोवेळी ऑनलाईनद्वारे घेतलेल्या बैठकीतील निर्देशानुसार विविध घटकाकडून गुगल फॉर्म व Suggestion फॉर्मद्वारे माहिती घेऊन, शासनाच्या धोरणानुसार डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० व विद्यापीठ अधिनियमातील तरतूदीनुसार कौशल्य आधारित व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना प्राधान्य देऊन सर्वेक्षणासह सम्यक योजनेचे प्रारुप तयार केलेले आहे. सदरील प्रारुप अंतिम करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०७ (१) मधील तरतुदीनुसार अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर करुन तयार करावी लागणार आहे. तद्नंतर व्यवस्थापन परिषदेमार्फत सदरील योजना विद्यापरिषद व अधिसभेत सादर करावी लागणार आहे.<br>शासनाने सम्यक योजनेसंदर्भात दि. २३/०५/२०२३ रोजी दुपारी ठिक ०३:१० वा. ऑनलाईन बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी विहित कार्यवाही करुन शासनास दि.२०/०६/२०२३ पर्यंत सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार विद्यापीठ विविध प्राधिकरणाची मंजूरी घेऊन शासनास सादर करावी लागणार आहे. त्यामुळे सदरची बाब अधिष्ठाता मंडळाच्या दि.२५/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत सादर केली असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.<br>"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ते २०२८-२९ चा पंचवार्षिक बृहत आराखडा दुरुस्तीसह मान्य करुन विद्यापरिषदेकडे मान्यतेसाठी शिफारस करण्यात आली." | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | उक्त ठरावाच्या अनुरोधाने सदरील बाब दि.३१/०५/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आलेली होती. त्यावर विद्यापरिषदेने दि.३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.<br>"शासनाने दि. १६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी विद्यापीठाने गठित केलेल्या अभ्यास समितीचे प्रारुप अंतिम करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली."<br>विद्यापरिषदेने दि.३१/०५/२०२३ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार उक्त बाब व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता दिली असल्याने सदरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावी लागणार आहे.<br>सबब, शासनाने दि.१६/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देशित केल्यानुसार प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीची पंचवार्षिक सम्यक योजना (बृहत आराखडा) सर्वेक्षणासह प्रारुप तयार करण्यासाठी विद्यापीठाने गठित केलेल्या अभ्यास समितीचा प्रारुप अंतिम करण्याकरिता अधिष्ठाता मंडळाने दुरुस्तीसह मान्य करुन विद्यापरिषदेकडे शिफारस केलेली आहे. त्याअनुरोधाने विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०२४ ते २०२९ या कालावधीच्या पंचवार्षिक सम्यक योजनेस (बृहत आराखडा) दुरुस्तीसह सर्वानुमते विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४] | दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १९ वर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील सर्व अभ्यासक्रम अनुदानित करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी ही अधिसभा व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेस करीत आहे असा ठराव पारित केला आहे. सदर ठरावानुसार विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेले अभ्यासक्रम (Courses / Programmes) अनुदानित करण्यासाठी शासनाकडे विनंती करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |

**दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १९ वर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील सर्व अभ्यासक्रम अनुदानित करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी ही अधिसभा व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेस करीत आहे असा ठराव पारित केला आहे. सदर ठरावानुसार विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेले अभ्यासक्रम (Courses / Programmes) अनुदानित करण्यासाठी शासनाकडे विनंती करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकरणांनी दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठ परिसर विविध संकुलांतर्गत खालील अभ्यासक्रम (Courses / Programmes) सुरु करण्यात आले आहेत. त्याचे सर्वकष विवरण खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | संकुलाचे नाव | विद्यापरिषद/व्यवस्थापन परिषदेचा विषय क्रमांक व दिनांक | संकुलात कार्यरत विनाअनुदानित अधिविभाग | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| १) | रसायनशास्त्र संकुल (School of Chemical Sciences) | वि. प. दि.२०/०८/२०१९ विषय क्र.२० व्य. प. दि.१९/०९/२०१९ विषय क्र.११(३) | M.Sc. Medicinal Chemistry | २०+२०=४० |
| २) | पदार्थविज्ञान संकुल (School of Physical Sciences) | वि. प. दि.२०/०८/२०१९ विषय क्र.२० व्य. प. दि.१९/०९/२०१९ विषय क्र.११(४) | i) M.Sc. Physics (Condensed Matter Physics) | २०+२०=४० |
| | | वि. प. दि.३०/१२/२०२० विषय क्र.१४ व्य. प. दि.१५/०२/२०२१ विषय क्र.५ | ii) M.Sc. Physics (Energy Studies) | २०+२०=४० |
| ३) | संगणकशास्त्र संकुल (School of Computational Sciences) | वि. प. दि.३०/०१/२०१९ विषय क्र.५९(५) व्य. प. दि.०६/१२/२०१८ विषय क्र.२१ | i) M.Sc. Biostatistics | २०+२०=४० |
| ४) | सामाजिकशास्त्रे संकुल (School of Social Sciences) | महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन आदेश क्र.एनजीसी २०१८/(३२२/१८)/मशि-४, दि.०४ मार्च, २०२० कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता | i) B.Voc. | ५०+५०+५० = १५० |
| | | वि. प. दि.३०/१०/२०२१ विषय क्र.४९(१०) व्य. प. दि.२६/११/२०२१ विषय क्र.२२(२) | ii) M.A. History | २४+२४=४८ |
| | | | iii) M.A. Political Science | २४+२४=४८ |
| | | | iv) M.A. Public Administration | २४+२४=४८ |
| | | वि. प. दि.१०/०७/२०२१ विषय क्र.११५ व्य. प. दि.३०/०८/२०२१ विषय क्र.११(२) | v) P.G. Diploma in Museology | २० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वि. प. दि.३०/१०/२०२१<br>विषय क्र.४९(५)<br>व्य. प. दि.२६/११/२०२१<br>विषय क्र.२१ | vi) Advanced P.G. Diploma in Electronic Media | २० | |
| | | वि. प. दि.२७/०६/२०२२<br>विषय क्र.१३<br>व्य. प. दि.१८/०७/२०२२<br>विषय क्र.४५ | vii) M.A. Psychology | ३०+३०=६० | |
| ५) | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल (School of Commerce & Management) | वि. प. दि.२६/०४/२०११<br>विषय क्र.११<br>व्य. प. दि.१७/०३/२०११<br>विषय क्र.१३ | i) M.Com. (Accountancy / Banking) | ९०+९०=१८० | |
| | | १) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय क्र.टिईएम-२००५/(२५१/०५) तंशि-१, दि.३०/०६/२००५<br>२) All India Council for Technical Education, New Delhi यांचे पत्र क्र.F.No.Western/१-४६२५९१३८२२ / २०१९/EOA, दि.२५/०४/२०१९ अन्वये कायम अनुदानित तत्वावर मान्यता<br>३) व्यवस्थापन परिषदेच्या दि.३०/०९/२०११ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.१८ वर पारित झालेला ठराव | ii) M.B.A. | १२०+१२०= २४० | |
| ६) | भाषा व वाङ्मय संकुल (School of Languages & Literature) | वि. प. दि.२९/१०/२०१८<br>विषय क्र.५३<br>व्य. प. दि.०३/०७/२०१८<br>विषय क्र.३(७) | i) M.A. Marathi | २४+२४=४८ | |
| | | | ii) M.A. Hindi | २४+२४=४८ | |
| | | | iii) M.A. English | २४+२४=४८ | |
| | | | iv) M.A. Sanskrit | २४+२४=४८ | |
| | | | v) M.A. Urdu | २४+२४=४८ | |
| | | वि. प. दि.२०/०८/२०१९<br>विषय क्र.२१<br>व्य. प. दि.१९/०९/२०१९<br>विषय क्र.११(२) | vi) M.A.Kannada | २०+२०=४८ | |
| | | | vii) M. A. Pali | २०+२०=४० | |
| | | | viii) M.A. Prakrit | २०+२०=४० | |
| ७) | तंत्रज्ञान संकुल (School of Technology) | वि. प. दि.२९/१०/२०१८<br>विषय क्र.५५<br>व्य. प. दि.०३/०७/२०१८<br>विषय क्र.३(९)<br>व्य. प. दि.०६/१२/२०१८<br>विषय क्र.२३ | Five Year Integrated M.Tech. Course in Cosmetic Technology | ३० x ५=१५० | |

| अ. क्र. | संकुलाचे नाव | विद्यापरिषद/व्यवस्थापन परिषदेचा विषय क्रमांक व दिनांक | संकुलात कार्यरत विनाअनुदानित अधिविभाग | विद्यार्थी प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| ८) | आरोग्य विज्ञान संकुल (School of Allied Health Science) | वि. प. दि.२९/१०/२०१८ विषय क्र.४८ व्य. प. दि.०६/१२/२०१८ विषय क्र.२१ | i) P.G. Diploma in Nutrition & Dietetics | ३० |
| | | वि. प. दि.२४/०३/२०२१ विषय क्र.३२(४) व्य. प. दि.३१/०५/२०२१ विषय क्र.७ | ii) M. A. Yoga | ३०+३०=६० |
| ९) | ललितकला व कला संकुल (School of Arts & Performing Fine Arts) | वि. प. दि.२०/०८/२०१९ विषय क्र.१८ व्य. प. दि.१९/०९/२०१९ विषय क्र.११(५) | i) M. A. Music (Vocal / Instrumental) | २०+२०=४० |
| | | | ii) M.A. Music (Tabla/ Pakhvaj) | २०+२०=४० |
| | | | iii) M. A. Dramatics | २०+२०=४० |
| | | वि. प. दि.२७/०६/२०२२ विषय क्र.१२ व्य. प. दि.१८/०७/२०२२ विषय क्र.४६ | iv) M. A. Visual Arts | ३०+३०=६० |
| १०) | जैवविज्ञान संकुल (School of Life Science) | व्य. प. दि.१३/०४/२०२० विषय क्र.३ वि. प. दि.०६/०६/२०२० विषय क्र.६७(१७) वि. प. दि.१०/१०/२०२० विषय क्र.१ व्य. प. दि.२६/११/२०२० विषय क्र.३ व्य. प. दि.०३/०३/२०२१ विषय क्र.४ | i) M. Sc. Microbiology | २०+२०=४० |
| | | वि. प. दि.०३/१०/२०२२ विषय क्र.२ व्य. प. दि.१८/०७/२०२२ विषय क्र.४७(४) | ii) M. Sc. Bioinformatics | २०+२०=४० |
| | | | iii) B. Sc. Biological Science | ४० x ३=१२० |
| ११) | Constituent UG College (Arts, Science & Commerce) | वि. प. दि.३०/१०/२०२१ विषय क्र.४९(१०) व्य. प. दि.२६/११/२०२१ विषय क्र.२२(२) | i) B.A. Liberal Arts | ८० x ४=३२० |
| | | | ii) B.Sc. Liberal Science | ६० x ४=२४० |
| | | | iii) B.Com. Liberal Commerce | ८० x ४=३२० |
| | ११ | | अधिविभाग-३४ | |

दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत अधिसभा सदस्य डॉ.सुशिल कुमार शिंदे यांनी विषय क्र.१९ वर ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली. त्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील सर्व अभ्यासक्रम अनुदानित करावे अशी विनंती शासनास करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस व विद्यापरिषदेस करीत आहे. सदरच्या ठरावास ॲड. मल्लिनाथ शहाबादे यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे व विद्यापरिषदेकडे शिफारस करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| | सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३०(१) अन्वये व्यवस्थापन परिषद विद्यापीठाची मुख्य कार्यकारी व धोरण आखणारे प्रमुख प्राधिकरण असल्याने आणि ती अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे विनिर्देशपूर्वक नेमूण दिली नसतील अशी कर्तव्ये पार पाडत असल्याने विद्यापीठाने उपरोक्त अभ्यासक्रम विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतदूंनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेअन्वये विद्यापीठाच्या सामान्य निधीतून स्वयंसहाय्यित तत्वावर स्थानिक विद्यार्थ्यांची निकड लक्षात घेवून सुरु केले आहेत. सदर अभ्यासक्रम शासनाकडे अनुदानित करण्यासाठी शिफारस करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | दि.०४/०२/२०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १९ वर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथील सर्व अभ्यासक्रम अनुदानित करण्यासंदर्भात शासनास शिफारस करण्यासाठी ही अधिसभा व्यवस्थापन परिषद व विद्यापरिषदेस करीत आहे असा ठराव पारित केला आहे. सदर ठरावानुसार विद्यापीठाने विद्यापीठ कायद्यातील तदानुषंगिक तरतूदींनुसार सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेन्वये विविध संकुलात सुरु करण्यात आलेले अभ्यासक्रम (Courses / Programmes) अनुदानित करण्यासाठी शासनाकडे विनंती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. मात्र त्यापूर्वी शासनास हमीपत्र दिले आहे का ते तपासून पुढील कार्यवाही करावे असे ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक) पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक यांच्या Academic Level १२ to १३A (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक) कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता प्राप्त प्रस्तावाची मा.कुलगुरु महोदयांनी गठित केलेल्या छाननी समितीकडून पडताळणी होऊन छाननी समिती अहवाल विभागास प्राप्त झाला आहे.<br>सदर कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या पुढील प्रक्रियेसाठी शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये निवड समिती (Selection Committee) गठित होणे आवश्यक असून, निवड समितीमधी क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य यांचे नामनिर्देशनाची तरतूद आहे.<br>सबब, सदर तरतूदीनुसार कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र.vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत नियमित पदावर कार्यरत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक) पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये गठीत करण्यात येणाऱ्या Selection Committee मधील क्र. vii नुसार व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाच्या व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेले एक प्राचार्य मधून प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.<br>तसेच यापुढील कॅस अंतर्गत पदोन्नतीकरिता व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असलेले प्राचार्य प्रवर्गातून प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे व प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांचे आळीपाळीने नामनिर्देशन करण्याचे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत A. L. १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शा. नि. दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी म. सा. वि. अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ नियमित पदावर कार्यरत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत Academic Level १२ to १३A (सहाय्यक प्राध्यापक पदावरुन सहयोगी प्राध्यापक) पदोन्नतीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ नुसार गठीत करावयाच्या Selection Committee मधील क्र. v नुसार ज्या विषयासाठी अध्यापकांची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्यापरिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेल तीन पेक्षा अधिक नसतील इतक्या तज्ज्ञांची निवड करावयाची तरतूद विशद केली आहे.<br>त्यानुसार डॉ. आर. एस. मेंते यांच्या कॅस अंतर्गत पदोन्नतीची पुढील प्रक्रिया पार पाडण्यासाठी एम.सी.ए. या विषयासाठी विद्यापीठाबाहेरील विषय तज्ञांची आवश्यकता असल्याने, प्रस्तुत विद्यापीठाचे विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता यांचेकडून संबंधित विषयातील विषय तज्ज्ञांची यादी मागविण्यात आली असून, त्यांनी सात विषय तज्ञांची यादी दिलेली आहे.<br>त्यानुषंगाने सदर विषय तज्ज्ञांच्या यादीमधील सहा विषय तज्ज्ञांची नावे मा.कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने अधोरेखीत करुन मान्यता दिली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील डॉ. आर. एस. मेंते यांच्या कॅस अंतर्गत A. L. १२ to १३A पदोन्नतीसाठी राबवावयाच्या निवड समितीकरिता शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी विद्यापरिषदेच्यावतीने म. सा. वि. अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके विषय तज्ज्ञ नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ संकुलांतर्गत डॉ. आर. एस. मेंते, सहाय्यक प्राध्यापक, संगणकशास्त्र संकुल यांचे कॅस अंतर्गत A. L. १२ to १३A पदोन्नतीकरिता राबवावयाच्या निवड समितीकरिता शा. नि. दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी म. सा. वि. अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ नामनिर्देशन करण्याबातचे अधिकार मा.कुलगुरुमहोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | "Minor Research Project साठी विद्यापीठाकडुन दिल्या जाणाऱ्या Seed Money अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी अशी अधिसभेनी केलेली शिफारस विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडुन दिल्या जाणाऱ्या "Seed Money for Researcher" अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी अशी शिफारस डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यानी दि.१४ मार्च, २०२३ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केली आहे त्यानुसार दि.१४ मार्च, २०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ११ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.<br><br>**ठराव:** **सदरचा प्रस्ताव डॉ. जैनोद्दीन खतालसो मुल्ला यांनी मांडल्यानंतर त्यास प्राचार्य डॉ. राजेंद्रकुमार नारायणराव शेंडगे यांनी दिले. त्यानंतर सदर प्रस्तावाची सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.**<br><br>सद्यस्थितीत विज्ञान व तंत्रज्ञान या विद्याशाखेस रु.१,००,०००/- व रु.६०,०००/- उर्वरित विद्याशाखेस "Seed Money for Researcher" साठी प्रस्तुत विद्यापीठाकडुन सर्व नियमित शिक्षकांना दोन वर्षाच्या कालावधी मध्ये देण्याची तरतुद आहे. (P.A.H. Solapur University, Solapur Norms & Guidelines क्र. ०२ नुसार)<br><br>सबब, "Minor Research Project साठी विद्यापीठाकडुन दिले जाणारे Seed Money अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी अशी अधिसभेनी केलेली शिफारस विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग-२ (युजीसी) |
| ठराव: | **Seed Money for Researcher and Minor Research Project साठी विद्यापीठाकडुन दिले जाणाऱ्या अनुदानामध्ये वाढ करण्यात यावी याबाबत निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्यासाठीचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्याचे सर्वानुमते ठरले. तसेच सदर समितीने कालबध्द पध्दतीने अहवाल द्यावा असे ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ १८ ] | **परीक्षा विभागाकडील संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद शुल्का व्यतीरिक्त इतर बाबींसदर्भात जसे की कागदपत्रे साक्षांकित करणे, नावात दुरुस्ती करणे, जात व लिंग दुरुस्ती करणे व इतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास रु.१०० इतके शुल्क आकारण्याकरिता परीक्षा व मूल्यमापन मंडळाने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचेसुधारीत परीपत्रक २०२० जा. क्र. पुअहोसोविसो/ पवमुवि / परीक्षा / २०२० / ६३७, दि.२८/०८/२०२० नुसार प्रस्तुत विद्यापीठ सर्व संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ संकुल संचालक, शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी यांना विविध कामाकरिता अर्ज करावे लागते. याबाबत संबंधितांना इतर बाबीकरिता शुल्क निश्चित नसल्याने व त्याबाबतची माहिती नसल्याने विद्यापीठाकडे वारंवार विचारणा करण्यात येत होती. त्याकरिता उपरोक्त संदर्भीय परिपत्रकान्वये विविध शुल्का संबंधीची माहिती विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.<br>उपरोक्त संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद शुल्का व्यतीरिक्त इतर बाबींसंदर्भात (उदा. कागदपत्रे साक्षांकित करणे, नावात दुरुस्ती करणे, जात व लिंग दुरुस्ती करणे व इतर) प्रस्ताव आल्यास किती शुल्क आकारावे याबाबत सदर परिपत्रकामध्ये माहिती उपलब्ध नाही. त्याकरिता दि.३१/०५/२०२३ रोजी सादर केलेल्या टिपणीवर सदरचा विषय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर करण्याचे निर्देश प्राप्त झाले आहेत. त्यानुसार परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील इतर बाबींसंदर्भात किती शुल्क आकारावे ही बाब निश्चित करुन मिळण्याकरिता सदरचा विषय परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि.०७/०६/२०२३ रोजीच्या बैठकीमध्ये विचारार्थ सादर केला असता परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.<br>ठराव ७ (१) :"कार्यवाही पध्दती विचारात घेता संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद शुल्का व्यतीरिक्त इतर बाबींसंदर्भात जसेकीकागदपत्रेसाक्षांकितकरणे, नावात दुरुस्ती करणे, जात व लिंग दुरुस्ती करणे व इतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास रु.१०० इतके शुल्क आकारण्याची शिफारस व्यवस्थापन परिषदेसकरण्यात आली."<br>सबब, परीक्षा विभागाकडील परिपत्रकामध्ये नमूद शुल्का व्यतीरिक्त इतर बाबींसदर्भात जसे की कागदपत्रे साक्षांकित करणे, नावात दुरुस्ती करणे, जात व लिंग दुरुस्ती करणे व इतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास रु.१०० इतके शुल्क आकारण्याकरिता परीक्षा व मूल्यमापन मंडळाने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | **परीक्षा विभागाकडील संदर्भीय परिपत्रकामध्ये नमूद शुल्का व्यतीरिक्त इतर बाबींसदर्भात जसे की कागदपत्रे साक्षांकित करणे, नावात दुरुस्ती करणे, जात व लिंग दुरुस्ती करणे व इतर प्रस्ताव प्राप्त झाल्यास रु.१०० इतके शुल्क आकारण्याकरिता परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | M/s. Splashgain Technology Solution Pvt.Ltd. Pune या फर्मला Partly Payment म्हणून रु.१५,५०,०००/- देण्याची बाब विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |

टिपणी: परीक्षा व मूल्यमापन विभागाकडील परीक्षेचे कामकाज ICT चा उपयोग करण्या संदर्भात श्री. राजेश अग्रवाल समितीने सुचविलेल्या उपाय योजनेनुसार परीक्षेच्या कामाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार होणाऱ्या सर्व अभ्याक्रमाच्या परीक्षा ही On Screen Evaluation / Digital Valuation / On Screen Marking / Photo copy and Revaluation पध्दतीने मध्यवर्ती मूल्यमापनाचे काम यशस्वीरित्या करण्याकरीता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडून ई-निविदा प्रक्रिया पुर्ण केले असून परीक्षा व मूल्यमापन विभागानी फर्मसोबत करार (Agreement) केले असून सदरचा करार (Agreement) सोबत आवलोकनार्थ जोडला आहे. M/s. Splashgain Technology Solution Pvt.Ltd. Pune यांच्या सोबत करार (Agreement) केला आहे त्यानुसार वरील फर्मला मान्य झालेले दर खालीलप्रमाणे आहेत.

| Sr. No. | Particular | Your Quoted rate |
|---|---|---|
| 1 | Part- I : OSM 1. Cost per Answer Booklet for OSM<br>2. Cost per Application for Photocopy<br>3. Cost per Application for Revaluation | Rs.15.30 |
| 2 | Part- II : NONOSM 1. Scanning of Barcode & Result<br>2. Cost per application for Photocopy.<br>3. Cost per Application for Revaluation | Rs.4.95 |
| | Total Amount | Rs.20.25 |
| | GST | Rs.3.64 |
| | **Total Amount Including GST** | **Rs.23.89** |

सबब, त्यानुसार ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ च्या परीक्षेचे काम वरील फर्मने केले असून सदर्भ क्र.२ नुसार रु.१५,५०,०००/- इतक्या रक्कमेची आग्रीम स्वरूपात मागणी केलेली आहे. फर्मसोबत झालेल्या करारानुसार सदरचे काम समाधानकारक आहे की नाही हे प्रमाणित करण्यासाठी समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यावाही करण्यास तसेच सदर फर्मने ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ परीक्षेचे काम अंतिम टप्प्यात असल्याने सदर फर्मला Partly Payment म्हणून रु.१५,५०,०००/- देण्याची बाब विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | M/s. Splashgain Technology Solution Pvt. Ltd., Pune या फर्मला Partly Payment म्हणून रु.१५,५०,०००/- देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २० ] | **मार्च/एप्रिल २०२३ च्या परीक्षा दि. १९/०६/२०२३ रोजी पासून सुरु होणार असल्याने कामाची निकड व वेळ मर्यादा याचा विचार करता तातडीची बाब म्हणुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये M/s SHPC Technologies Pvt. Ltd. या फर्मला प्रश्नपत्रिका (DTP Typesetting and secured Remote Paper Delivery) ऑनलाईन पध्दतीने (SRPD) वितरण प्रणाली कामाचे कार्यारंभ आदेश देण्यास व्यवस्थापन परीषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी: वित्त व लेखा विभागाची १५/०६/२०२३ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी अवलोकनार्थ सोबत ठेवली आहे.<br>माहे मार्च/एप्रिल -२०२३ या सत्राच्या सर्व विद्याशांखार्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या होणाऱ्या सत्र परीक्षांच्या प्रश्नपत्रिका (DTP Typesetting and secured Remote Paper Delivery) ऑनलाईन पध्दतीने (SRPD) वितरण प्रणाली द्वारे करुन घेण्याकरिता या विभागाच्या दि.२५/०६/२०२३ रोजीच्या टिपणीवरील मा. कुलगुरु महोदया यांच्या मान्यतेनुसार ई-निविदा प्रकिया पार पाडून गोपनिय फर्म निश्चित करून मिळणेबाबत वित्त व लेखा विभागास कळविण्यात आले होते.<br>त्यानुसार वित्त विभागाने विहित निविदा प्रक्रिया पार पाडून तौलनिक तक्ता तयार करुन सदरचा विषय १५/०६/२०२३ च्या खरेदी समिती समोर ठेवून, तौलनिक तक्यातनुसार न्युनतम दर असलेल्या M/s SHPC Technologies Pvt. Ltd. यांचे समवेत दराबाबत वाटाघाटी करुन प्रश्नपत्रिका डी.टी.पी. स्वरुपात तयार करणे व ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्रास वितरीत करण्याचे गोपनीय काम दर रु.२५०/- अधिक GST १८% रु.४५/- असे एकूण रु.२९५/- प्रमाणे त्याप्रमाणे कार्यारंभ आदेश देण्यास वित्त व लेखासमितीस शिफारस करण्यात आली. वित्त व लेखासमितीने खरेदी समितीने केल्याठरावास मान्यता देवून तशी शिफारस व्यवस्थापन परीषदेस करण्यात आली. त्यानुसार वित्त विभागाने परीक्षा व मूल्यमापन विभागास असे कळविले आहे की, व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची कार्यवाही आपल्यास्तरावरुन पूर्ण करून संबंधित फर्मसोबत दर करार करणे, सुरक्षा ठेव घेणे, कार्यारंभ आदेश देणे इ. अनुषंगिक कार्यवाही करणेबाबत या विभागास दि.१५/०६/२०२३ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीअन्वये कळविले आहे.<br>वित्त व लेखा विभागाच्या दि.१५/०६/२०२३ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी अवलोकनी घेता, वित्त व लेखा विभागाने ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करून संबंधित गोपनिय फर्मशी वाटाघाटीकरून दर निश्चित करून या कार्यालयास पाठविले आहे. त्यानुसार संबंधित गोपनिय फर्म सोबत करारानामा करून करारनाम्यानुसार सुरक्षा ठेव स्विकारुन कार्यारंभ आदेश देणे गरजेचे आहे. या करीता व्यवस्थापन परीषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br>सबब, मार्च/एप्रिल २०२३ च्या परीक्षा दि.१९/०६/२०२३ रोजी पासून सुरु होणार असल्याने, कामाची निकड व वेळ मर्यादा याचा विचार करता तातडीची बाब म्हणुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये M/s SHPC Technologies Pvt. Ltd. या फर्मला प्रश्नपत्रिका (DTP Typesetting and secured Remote Paper Delivery) ऑनलाईन पध्दतीने (SRPD) वितरण प्रणाली कामाचे कार्यारंभ आदेश देण्यास व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | **मा. कुलगुरुमहोदयांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळ व वित्त व लेखा समितीने केलेल्या कामकाजाची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २१ ] | **सन २०२३ या वर्षी वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स चेंगडू (चायना) येथे श्री. अरुण राठोड यांना २१ कि. मी. हाफ मॅरेथॉन या खेळप्रकारात सहभागी होण्याबाबत व त्यासाठी होणारा ₹१,८७,२००/- इतक्या खर्चाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सन २०२३ या वर्षातील वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स चे आयोजन चेंगडू (चायना) येथे दि.२८ जुलै ते ०८ ऑगस्ट २०२३ या दरम्यान करण्यात आले आहे. सदर स्पर्धेची निवड चाचणी दि.१४ व १५ जून, २०२३ या कालावधती KIIT-Deemed to be University, Bhubaneswar येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रस्तुत विद्यापीठाचा श्री. अरूण राठोड २१ कि. मी. हाफ मॅरेथॉन या खेळप्रकारात सहभागी झाला होता. सदर विद्यार्थ्याची वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स साठी निवड झाल्या बाबत तसेच वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स मध्ये सहभागी होण्यासाठी प्रवास खर्च दिल्ली ते चेंगडू (येणे -जाणे) व्हिसासहित फी + कर इ.नोंदणी फी, सहभाग फी, जनरल प्लेईंग किट सेरेमिनिअल ड्रेस आणि विविध शुल्क या करीता रक्कम रु.१,८७,२००/- इतकी दि.२५/०६/२०२३ रोजी संध्याकाळी ०५:०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत दि.२२/०६/२०२३ रोजी ई-मेल द्वारे कळविले आहे. (सोबत पत्र जोडलेले आहे) तरी सदर बाब अतितात्काळ असल्यामुळे श्री.अरुण राठोड - २१ कि.मी.हाफ मॅरेथॉन या खेळप्रकारात सहभागी होण्याकरीता रुपये १,८७,२००/- इतका खर्च होणार असून सदरचा होणारा खर्च हा या विभागाच्या Inter University Participeting Expenses या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली खर्ची टाकण्या संदर्भात विभागा कडून मा.कुलगुरु महोदय यांच्या मान्यते करीता ठेवण्यात आलेल्या दि.२२/०६/२०२३ रोजीच्या टिपणी सादर केली असता, मा.कुलगुरु महोदय यांनी सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या बैठकी समोर विचारार्थ सादर करणे अपेक्षित आहे असे सूचित करण्यात आले आहे.<br>सबब, सन २०२३ या वर्षी वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स चेंगडू (चायना) येथे श्री. अरूण राठोड यांना २१ कि. मी. हाफ मॅरेथॉन या खेळप्रकारात सहभागी होण्याबाबत व त्यासाठी होणारा ₹१,८७,२००/- इतक्या खर्चाची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **सन २०२३ या वर्षी वर्ल्ड युनिव्हर्सिटी गेम्स चेंगडू (चायना) येथे श्री. अरूण राठोड यांना २१ कि. मी. हाफ मॅरेथॉन या खेळप्रकारात सहभागी होण्याबाबत व त्यासाठी होणारा ₹१,८७,२००/- इतक्या खर्चास किंवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास (२ लाखाच्या मर्यादेपर्यंत) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २२ ] | **दि.१४ मार्च २०२३ च्या अधिसभा सदस्य श्री संजय नामदेव साळुंखे यांनी खालील ठराव मांडण्यासाठी पाठविलेली सूचना व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: सोलापूर जिल्हयातील महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या व प्रथम, द्वितीय वा तृतीय क्रमांक पटकावलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस केली आसता उपरोक्त बाबत खालील प्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे<br>ठराव: सदरचा प्रस्ताव श्री. संजय नामदेव साळुंखे यांनी मांडल्यानंतर त्यास डॉ. विरभद्र चनबस दंडे यांनी अनुमोदन दिले. त्यांनंतर सदर प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>उपरोक्त ठरावानुसार क्रीडा सोलापूर जिल्हयातील महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांमध्ये जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या व प्रथम, द्वितीय वा तृतीय क्रमांक पटकावलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग |
| ठराव: | **आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठातर्फे खेळणाऱ्या व सदर स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय वा तृतीय क्रमांक पटकावलेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर हा पुरस्कार प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच याबाबत नियमावली तयार करण्यासाठी श्री. सचिन गायकवाड व बोर्ड ऑफ स्पोर्टस् चे एक सदस्य (नाव ठरविण्याचे अधिकार मा. कुलगुरुंना दिले) आणि संचालक, क्रीडा विभाग यांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २३ ] | **विद्यार्थ्यांकडून जमा होणारा प्रो-रेटा शुल्क वाढविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या दि.२७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.०३ अन्वये विद्यार्थ्यांकडून जमा होणारा प्रो-रेटा शुल्क वाढविण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.<br>ठराव: प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ/पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ/क्रीडा महोत्सव/खेलो इंडिया या विविध स्पर्धेत सहभागी होत असतात सदर स्पर्धेत सहभाग नोंदविणाऱ्या खेळाडू/संघ प्रशिक्षक/संघव्यवस्थापक यांच्या प्रवासाकरीता ५०% सवलत मिळत होती. ती सवलत रेल्वे विभागाकडून रद्द करण्यात आली असल्याने विद्यार्थ्यांकडून जमाहोणाऱ्या प्रो-रेटा शुल्क ₹६०/-वरून ₹२५०/-करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्याची बाब क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ यांच्या बैठकीमध्ये ठरलेली आहे.<br>सबब, उपरोक्त ठरावानुसार विद्यार्थ्यांकडून जमा होणाऱ्या प्रो-रेटा शुल्क ₹६०/-वरुन ₹२५०/-करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | **विद्यार्थ्यांकडून जमा होणारा प्रो-रेटा शुल्क वाढविण्याबाबत दि.२७/०४/२०२३ रोजीच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.३ अन्वये केलेली शिफारस सर्वानुमते अमान्य करण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २४ ] | दयानंद इन्स्टिट्यूट, सोलापूर या संस्थेचे डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्य पदाच्या नियुक्ती संदर्भातील व्यवस्थापन परिषदेचा निर्णय दि.१३/०१/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.१२ व दि.२१/०२/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.५ नुसार घेतलेल्या निर्णयासंदर्भात गठीत त्रिसदस्यीय समितीने संस्थेस / महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून व पाहणी करुन तसेच आवश्यक कागदपत्रांचे मुद्देनिहाय पडताळणी करुन आढावा समितीने सादर केलेला अहवाल विचारार्थ.<br>टिपणी: दयानंद इन्स्टिट्यूट, सोलापूर या संस्थेचे डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्य पदाच्या नियुक्ती संदर्भात प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतलेल्या निर्णयाबाबत दि.१३/०१/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.१२ व दि.२१/०२/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.५ च्या अनुषंगाने सदर संस्थेस विद्यापीठ पत्र क्र.पुअहोसोविसो / शिमा-१ / २०२२-२३ / १५९३, दि.०६/०३/२०२३ अन्वये कार्यवाहीबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार संस्थेने पत्र क्र.२०२३/आस्था/९०/४३०, दि.०५/०४/२०२३ अन्वये उत्तर दिले.<br>दयानंद इन्स्टिट्यूट, सोलापूर या संस्थेचे पत्र क्र.२०२३/आस्था/९०/४४५, दि.२४/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये उक्त व्यवस्थापन परिषदेचा ठराव रद्द करण्याबाबत विद्यापीठास विनंती केली. त्याअनुषंगाने मा. कुलगुरुमहोदयांनी त्रिसदस्यीय आढावा समिती गठीत केली आहे. सदर समितीने आज दि.२२/०६/२०२३ रोजी प्रत्यक्ष भेट देवून व पाहणी करुन तसेच आवश्यक कागदपत्रांचे मुद्देनिहाय पडताळणी करुन आढावा समितीने अहवाल विद्यापीठाकडे सादर केला.<br>सबब, दयानंद इन्स्टिट्यूट, सोलापूर यांच्या संदर्भातील व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने त्रिसदस्यीय आढावा समितीचा अहवाल विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | दयानंद इन्स्टिट्यूट, सोलापूर या संस्थेचे डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयातील नियमित प्राचार्य पदाच्या नियुक्ती संदर्भातील व्यवस्थापन परिषदेचा निर्णय दि.१३/०१/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.१२ व दि.२१/०२/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषद बैठकीतील ठराव क्र.५ नुसार घेतलेल्या निर्णयासंदर्भात गठीत त्रिसदस्यीय समितीने संस्थेस / महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून व पाहणी करुन तसेच आवश्यक कागदपत्रांचे मुद्देनिहाय पडताळणी करुन आढावा समितीने सादर केलेला अहवाल स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २५ ] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि. ०१ मार्च २०१७ पासुन सर्व विद्यापीठांना लागु झाला आहे. त्यानुसार विद्यापीठ Common Statutes आणि Ordinance अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याने, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्या Ordinance framed under the provision of the Act, १९९४ मधील दंडक ९ (a) नुसार चेंजिस-इन-स्टाफ या समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधुन पाच समिती सदस्यांच्या नामनिर्देशनास्तव.<br>(टिपणी: विविध महाविद्यालयांकडुन प्राप्त प्रस्तावांचे चेंजेस इन स्टाफच्या गठीत समितीकडुन तपासणी करुन त्याची मा. व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेऊन सर्व महाविद्यालयांना कळविणे आवश्यक आहे. या बाबत दंडक ९ (a) मध्ये खालील प्रमाणे आहे.<br>0.9 (a) The Committee on Local Inquiry Committee Reports and Changes in College Staff shall consist of five members of the Executive Council who shall hold office for three years.<br>दि.०६ डिसेंबर २०१८ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र.४९(५) ठरावानुसार दंडक ९(a) अन्वये चेंजेस इन स्टाफ पडताळणीसाठी अध्यक्ष/सदस्यांचे खालीलप्रमाणे समितीचे नामनिर्देशन करण्यात आलेले होते.<br>१. डॉ. बी. पी. रोंगे : अध्यक्ष<br>२. डॉ. टी. एन. कोळेकर : सदस्य<br>३. डॉ. बी. एन. आदटराव : सदस्य<br>४. प्राचार्य डॉ. श्रीमती के. ए. पांडे : सदस्य<br>५. डॉ. श्रीमती एस. आय. शेख : सदस्य<br>वर नामनिर्देशित गठित समितीस दि.३१/१२/२०२१ रोजी तीन वर्षे पूर्ण झालेली असून नविन चेंजेस इन स्टाफची समिती गठित करणे आवश्यक होते त्यानुसार चेंजेस इन स्टाफ या समितीवर अध्यक्ष / सदस्यांचे नामनिर्देशन दि.१४/०९/२०२२ रोजीच्या टिपणीअन्वये मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदाच्या कलम १२(७) नुसार खालील प्रमाणे समिती गठीत केलेली आहे.<br>१. डॉ. एस. के. पवार : अध्यक्ष<br>२. डॉ. एस. के. पाटील : सदस्य<br>३. श्रीमती. डॉ. एम. जे. पाटील : सदस्य<br>४. डॉ. विष्णु पी. शिखरे : सदस्य<br>वरील सदस्यांपैकी काही सदस्य सेवानिवृत्त झालेले आहेत, होत आहेत. त्याअनुषंगाने नविन समिती गठीत होऊन मिळावी<br>सबब, उपरोक्त आदेशातील तरतुदीप्रमाणे चेंजिस-इन-स्टाफ समितीकरिता दंडक ०.९(a) प्रमाणे पाच सदस्यांच्या नामनिर्देशनाची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग-२ (युजीसी) |
| ठराव: | **चेंजिस-इन-स्टाफ समितीकरिता असणाऱ्या दंडक O.९(a) बाबत कायदेशीर सल्ला घेवून पुढील कार्यवाही करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**<br>**तसेच सद्य:स्थितीत सर्व विद्याशाखांचे अधिष्ठाता चेंजिस-इन-स्टाफ प्रस्तावातील कार्यवाही करतील असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २६ ] | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १४/१०/२०११ रोजीच्या शासन निर्णयामध्ये निलंबन आढावा समिती स्थापन करण्यात आल्याबाबत नमूद करण्यात आलेली आहे. निलंबन आढावा समिती गठीत करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाची स्थापना ०१/०८/२००४ रोजी झालेली असून महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदाच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ विद्यापीठास ०१/०५/१९८५ पासून लागू करण्यात आली होती. परंतु महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभागाने दि. २०/०५/२०१० रोजीच्या शासन निर्णयाद्वारे सदर प्रमाणसंहिता रद्द करण्यात येऊन त्याऐवजी सामाईक परिनियम (Common Statutes) लागू होईपर्यंत महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतुदी लागू करण्यात आलेल्या आहेत.<br>महाराष्ट्र शासन, सामान्य, प्रशासन विभागाच्या दि. १४/१०/२०११ रोजीच्या शासन निर्णयामध्ये निलंबन आढावा समिती स्थापन करण्यात आल्याबाबत नमूद करण्यात आले आहे. तथापि, प्रस्तुत विद्यापीठामध्ये निलंबन आढावा समिती गठीत करण्यात आलेली नसल्यामुळे निलंबन प्रकरणी आढावा घेणेकामी समिती गठीत होणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४/१०/२०११ रोजीच्या शासन निर्णयामध्ये निलंबन आढावा समिती स्थापन करण्यात आल्याबाबत नमूद करण्यात आलेली आहे. निलंबन आढावा समिती गठीत करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१४/१०/२०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार निलंबन आढावा समिती गठीत करण्याबाबतचे सर्वाधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले. | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ २७ ]</td><td>
प्रस्तुत विद्यापीठातील सहायक कक्ष अधिकारी व वरिष्ठ लिपिक या पदांच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.<br>
टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील सहायक कक्ष अधिकारी व वरिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त असलेल्या पदावर पात्र कर्मचाऱ्याला पदोन्नती देणे आवश्यक होते.<br>
उपरोक्तप्रमाणे नमूद केल्यानुसार सहायक कक्ष अधिकारी व वरिष्ठ लिपिक या पदाच्या पदोन्नती कोटयामध्ये रिक्त पदांवर पदोन्नती देण्याकरीता गठीत करण्यात आलेल्या विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.१७/०६/२०२३ रोजी दुपारी ०४.०० वाजता बैठक कक्षामध्ये संपन्न झाली.<br>
विभागीय पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पात्र खालील उमेदवारांची शिफारस केलेली असून त्यानुसार कार्यालयीन आदेश क्र. पुअहोसोविसो/ आस्था/पदोन्नती/२०२३/३८१५, दि.१९/०६/२०२३ व कार्यालयीन आदेश क्रमांक पुअहोसोविसो/आस्था/पदोन्नती/ २०२३/३८१६, दि. १९/०६/२०२३ अन्वये खालील कर्मचाऱ्यांना नमूद पदांवर तात्पुरती पदोन्नती देण्यात आले आहेत (सोबत समितीचा अहवाल व कार्यालयीन आदेशांची प्रत जोडलेली आहे).
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>अधिकारी/कर्मचाऱ्यांचे नांव व पदनाम</th><th>पदोन्नतीचा पदनाम</th><th>कर्मचाऱ्यांचा प्रवर्ग</th></tr>
<tr><td>१)</td><td>श्री. ज्ञानेश्वर अर्जुन निंबाळकर<br>वरिष्ठ लिपिक</td><td>सहायक कक्ष अधिकारी</td><td>अराखीव (खुला)</td></tr>
<tr><td>२)</td><td>श्री. महेश श्रीधर ढवळे<br>वरिष्ठ लिपिक</td><td>सहायक कक्ष अधिकारी</td><td>अराखीव (खुला)</td></tr>
<tr><td>३)</td><td>श्री. धाकडे विजयकुमार माधवराव<br>कनिष्ठ लिपिक</td><td>वरिष्ठ लिपिक</td><td>अनुसूचित जाती</td></tr>
<tr><td>४)</td><td>श्री. जाधव विजय दशरथ<br>कनिष्ठ लिपिक</td><td>वरिष्ठ लिपिक</td><td>विमुक्त जाती (अ)</td></tr>
</table>
सबब, प्रस्तुत विद्यापीठातील गट क मधील सहायक कक्ष अधिकारी व वरिष्ठ लिपिक या पदांच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदावर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार तात्पुरती पदोन्नती देण्याकरीता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याची बाब माहितीस्तव.
</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>प्रस्तुत विद्यापीठातील सहायक कक्ष अधिकारी व वरिष्ठ लिपिक या पदांच्या पदोन्नती कोटयातील रिक्त असलेल्या पदांवर महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्र. बीसीसी २०१८/प्र.क्र. ३६६/१६-ब, दि.०७/०५/२०२१ मध्ये नमूद तरतुदीनुसार सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याकरिता विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार पदोन्नती दिल्याबाबतची नोंद घेण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २८ ] | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्यावतीने विद्यापीठ वर्धापनदिनाचे औचित्य साधून दरवर्षी दि.०१ ऑगस्ट या दिवशी विविध पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०१९ पूर्वी विद्यापीठ संकुल परिसर व महाविद्यालयीन शिक्षक यांच्याकरीता स्वतंत्र पुरस्कार प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येत होती. तथापि, २०१९ साली विद्यापीठ वर्धापन दिन पुरस्कार नियमावलीबाबत फेरविचार करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठामार्फत त्रिसदस्यीय पुरस्कार फेरविचार समिती गठित करण्यात आली होती.<br>सदरील समितीद्वारे अभ्यास व चिंतन करुन सदर वर्धापन दिन पुरस्काराबाबतीत एका जिल्हयाचे कार्यक्षेत्र विचारात घेता शहरी व ग्रामीण असे पुरस्काराचे स्वरुप बदलून ते सर्वसमावेशक करुन शहरी, ग्रामीण, विद्यापीठ व महाविद्यालय असा फरक न करता विविध पुरस्कारासाठी आर्दश नियमावली तयार केलेली आहे. त्यानुसार प्रतीवर्षी वर्धापन दिनी शिक्षकांकरिता **उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार** प्रदान करण्यात येतो. सदरील पुरस्कारासाठी विद्यापीठ तसेच संलग्नित महाविद्यालयातील प्राप्त प्रस्तावांमधून गुणवत्तेनुसार एका शिक्षकास हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो.<br>तथापि, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ शैक्षिक संघ, सोलापूर या संघटनेने त्यांच्या दि. २२/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये, "विद्यापीठाकडून उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार दिला जातो. तो पूर्वीपासून विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी स्वतंत्र प्रत्येकी एक पुरस्कार दिला जात होता. परंतु मागील काही वर्षापासून तो एकच दिला जात आहे. त्यामुळे महाविद्यालयीन प्राध्यापकांवर अन्याय होत आहे. कारण त्यांना मिळणाऱ्या सोयी संविधा व इतर निधी या विद्यापीठ परिसरातील प्राध्यापकांपेक्षा कमी प्रमाणात प्राप्त होत आहेत. त्यामुळे त्यांना न्याय मिळण्यासाठी पूर्वीप्रमाणेच विद्यापीठ परिसर व संलग्नित महाविद्यलयातील प्राध्यापकांसाठी स्वतंत्र उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार सुरु करण्यात यावा." अशी विनंती केली आहे.<br>सबब, उपरोक्तप्रमाणे संघटनांकडून करण्यात आलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्याची बाब विचारार्थ. | कुलसचिव कार्यालय |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुल व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक यांना विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त प्रदान करण्यात येणारा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार स्वतंत्रपणे प्रदान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २९ ] | **FDC Limited Mumbai या कंपनीकडून शास्त्रीय उपकरणे देणगी स्वरुपात स्विकारण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: रसायनशास्त्र संकुलातून २००६-२००७ या शैक्षणिक वर्षात शिक्षण घेतलेले माजी विद्यार्थी श्री. सिद्राम सरक हे सध्या FDC Limited Mumbai या कंपनीमध्ये कार्यरत आहेत. सदर कंपनीमध्ये वापरात नसलेले परंतु उत्तम स्थितीत चालू असलेले काही शास्त्रीय उपकरणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील रसायनशास्त्र संकुलास देणगी स्वरुपात देवू इच्छित असल्याचे मा. संचालक, रसायनशास्त्र संकुल यांना भ्रमणध्वनीवरुन कळविले आहे. सदर उपकरणे गोवा, औरंगाबाद, नाशिक व मुंबई येथून विद्यापीठाने स्वखर्चाने घेवून जाण्याबाबत कळविले आहे.<br>सदर विषयी संचालक, रसायनशास्त्र संकुल यांनी मा. कुलगुरु यांच्याशी चर्चा केली असता सदर विषय व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्याचे निर्देश दिलेले आहेत.<br>सबब देणगी स्वरुपातील उपकरणे संकुलाकडील एम. एस्सी. भाग-१ व भाग-२ च्या विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक, प्रकल्प व संशोधन कामाकरिता निश्चित फायदेशीर ठरतील. शास्त्रीय उपकरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.<br>अ.क्र. — शास्त्रीय उपकरणाचे नाव<br>१ High Performance Liquid Chromatography (HPLC)<br>२ Dissolution Tester<br>३ IR Spectrophotometer<br>४ UV-Visible Spectrophotometer<br>५ Analytical Balance<br>६ Melting Point Apparatus<br>७ Polarimeter<br>सबब, शास्त्रीय उपकरणे देणगी स्वरुपात स्वीकारण्यास व विद्यापीठाने स्वखर्चाने आणण्याकरिता येणा-या अंदाजे ₹४०,०००/- इतक्या खर्चास संकुलाकडील Miscellaneous या अंदाजपत्रकीय शिर्षकाखालील तरतुदीतून खर्ची करण्याची बाब विचारार्थ. | रसायनशास्त्र संकुल |
| ठराव: | **FDC Limited Mumbai या कंपनीकडून शास्त्रीय उपकरणे देणगी स्वरुपात स्विकारण्यास व उपकरणे आणण्यासाठी येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३० ] | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.** | सांख्यिकी विभाग |

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम २०१६ कलम १३६ (१) नुसार व्यवस्थापन परिषदेने वार्षिक अहवाल स्विकारणे आणि ते अधिसभेकडे पाठविणे अशी तरतूद आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | प्राचार्य डॉ. संतोष वि. कोटी | अध्यक्ष |
| २ | प्राचार्य डॉ. शंकर द. नवले | उपाध्यक्ष |
| ३ | उपप्राचार्या डॉ. श्रीमती वंदना पुरोहीत | सदस्य |
| ४ | डॉ. श्रीमती अंजना सं. लावंड | सदस्य |
| ५ | डॉ. श्रीराम द. राऊत | सदस्य |
| ६ | श्री. मुकतार म. शेख | सदस्य - सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करून वेळोवेळी अहवाल समितीच्या बैठका आयोजीत करुन सदरचा मराठी व इंग्रजी भाषेतील अहवाल (पुस्तक स्वरूपात) तयार करून अधिष्ठाता मंडळाच्या दि.१९ जून, २०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.२ नुसार शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेकडे सादर करण्याची शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६(१) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १३६ (१) | अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल. |

सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक व सी.डी. स्वरुपात) तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव:** **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१ -२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल स्विकारुन सर्वानुमते दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**तसेच अधिसभेस पाठविण्यापूर्वी शुध्दलेखन दुरुस्तीकरीता समिती गठीत करण्यात आली. डॉ. भिमाशंकर भांजे, डॉ. दिपक ननवरे, डॉ. केदारनाथ काळवणे व डॉ. एजाज तांबोळी यांची समिती गठीत करण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ३१ ] | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६(१) तरतूदीनुसार, विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा वार्षिक अहवाल मराठी व इंग्रजी भाषेत तयार करण्यात आला असून, सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात आला आहे. सदरचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा मराठी व इंग्रजी वार्षिक अहवाल आगामी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा १८ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | सांख्यिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चा मराठी व इंग्रजी भाषेतील तयार केलेला १८ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने प्राचार्य डॉ. भिमाशंकर मुर्गप्पा भांजे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ३२ ]</td><td>मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना ऑक्टोंबर / नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेतील प्रति उत्तरपत्रिकेसाठी ₹७/- प्रमाणे उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क अदा करण्याची बाब व्यवस्थापन परीषदेच्या विचारार्थ.<br>संदर्भ: १) प्रस्तुत विद्यापीठाचे संदर्भ पत्र क्र. PAHSUS/EXAM/२०२३/१४५ दि.१९/०१/२०२३ रोजीचे पत्र.<br>२) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/३८७ दि.२७/०१/२०२३ रोजीचे पत्र.<br>३) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/३८७ दि.३०/१/२०२३ रोजीचे पत्र.<br>४) प्रस्तुत विद्यापीठाचे जा. क्र. PAHSUS/EXAM/२०२३/२४६ दि.३१/०१/२०२३ रोजीचे पत्र.<br>५) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/४०२ दि.०९/०२/२०२३ रोजीचे पत्र.<br>६) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/५६२ दि.१७/०४/२०२३ रोजीचे पत्र.<br>७) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/५६३ दि.१७/०४/२०२३ रोजीचे पत्र.<br>८) डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर व डॉ. आय. एम. चंडर्की, सहाय्यक, नोडल ऑफीसर यांचे संदर्भ पत्र क्र. NBNSCOE/२०२२-२३/Gen/५६२ दि.१७/०४/२०२३ रोजीचे पत्र.<br>९) मध्यवर्ती मुल्यमापन केंद्राची मा. कुलगुरु महोदया यांनी मान्य केलेली दि.०४/०५/२०२३ रोजीची टिपणी<br>टिपणी: ऑक्टोंबर / नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे On Screen Evaluation करण्यासाठी विविध परीक्षा केंद्रावरील उत्तरपत्रिका स्कॅनिंग करण्याकरीता एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव येथे मुख्य स्कॅनिंग केंद्र संदर्भ क्र. १ अन्वये देण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव यांनी मुख्य स्कॅनिंग केंद्रातील १) Stationary २) CCTV Cameras ३) Answer books processing charges (Rs. ५ per paper) ४) Printer ५) Electricity ६) Remuneration to ०१ Nodal Office, ०१ Assistant Nodal Officer ७) Internet ८) Infrastructure etc ९) Other Miscellaneous Charges या कामासाठी २० लाख अग्रीम रकमेची मागणी केलेली होती तसेच मे, २०१९ उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क ₹३/- रुपये होते. त्याप्रमाणे ऑक्टोंबर / नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेसाठी उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क ₹५/- रुपये मिळणेबाबत संदर्भ क्र. २ अन्वये विनंती केलेली होती. संदर्भ क्र. ३ अन्वये ऑक्टोंबर / नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेसाठी उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क ₹६/- रुपये मिळणेबाबत विनंती केलेली आहे.<br>दरम्यानच्या काळात प्रस्तुत विद्यापीठाचे जा.क्र. PAHSUS/EXAM/२०२३/२१० दि.२५/०१/२०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने डॉ. एस. डी. नवले, प्राचार्य तथा नोडल ऑफीसर यांचे दि.२८/०१/२०२३ रोजीच्या ईमेलव्दारे प्राप्त झालेले जा.क्र.NBNSCOE/२०२२-२३/ Gen/३८८, दि.२७/०१/२०२३ यांनी कळविल्याप्रमाणे एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव, सोलापूर यांना मुख्य स्कॅनिंग केंद्र सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग,</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
</table>

केगांव येथील स्कॅनिंग केंद्राच्या कामाकरीता विविध पदांवर १७ शिक्षक / कर्मचारी यांची नेमणुक करण्यास मान्यता देण्यात आलेली असून सदर शिक्षक / कर्मचारी यांना विद्यापीठ नियमानुसार भत्ता देय राहील अशी मा. कुलगुरु यांची मान्यता घेऊन संदर्भ क्र. ४ अन्वये कळविलेले आहे.

तदनंतर मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव येथे अंदाजे साडे तीन लाख उत्तरपत्रिका स्कॅन होवून संकलित करुन उच्च सुरक्षा व गोपनीयतेसह संग्रहीत केली जातील त्यामुळे कर्तव्याच्या उददेशाने मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, केगांव यांनी प्रति उत्तरपत्रिकेसाठी ₹६/- प्रमाणे उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क देण्याबाबत त्यांनी प्रस्तुत विद्यापीठास संदर्भ क्र. ५ अन्वये विनंती केलेली असून दि.२४/०१/२०२३ व ३१/०१/२०२३ रोजीच्या पत्रांकडे दुर्लक्ष करण्याबाबत कळविलेले आहे. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ६ च्या पत्रात विविध बाबीचे विवरण नमुद करुन प्रति उत्तरपत्रिकेसाठी ₹६/- प्रमाणे उत्तरपत्रिका शुल्क त्यांच्या महाविद्यालयास देणेबाबत विनंती केलेली आहे. तसेच त्यांच्या महाविद्यालयातील मुख्य स्कॅनिंग केंद्रातील विविध पदांवरील व्यक्तींना खालीलप्रमाणे मानधन मंजुर करण्याची संदर्भ क्र. ७ अन्वये विनंती केलेली होती.

| Sr. No. | Designation | Designation for Scanning Center | Proposed Remuneration |
|---|---|---|---|
| 1 | Principal | Nodal Officer (01) | 1000 Per Day |
| 2 | Asso. Prof. & Dean PG Program | Assistant Nodal Officer (01) | 1000 Per Day +TA Rs.400 (for Sundays and holidays and for the days on which submission of Answer booklets with grievances/Manual Assessment) |
| 3 | Clerk | Clerk (07) | 250 Per Person |
| 4 | Peon | Peon (07) | 150 Per Person |
| 5 | Security Guards | Security Guards (02) | 200 Per Person |

**दरम्यान संदर्भ क्र. ८ च्या पत्रात खालील मुद्दे नमूद करण्यात आलेले आहेत.**

१) वर्ष २०१९ मध्ये मे / जून परीक्षेसाठी त्यांच्या महाविद्यालयास प्रथमच स्कॅनिंग केंद्र वाटप करण्यात आले होते आणि संस्थेच्या प्रयोगशाळेत फक्त प्रथम वर्ष आणि व्दितीय वर्ष अभियांत्रिकी / फार्मसी उत्तरपत्रिका स्कॅन करण्यात आल्या होत्या आणि त्यांचे मुल्यांकन करण्यात आले होते. यासाठी ₹३/- मंजूर करण्यात आले होते आणि त्यावेळी तत्कालीन गोपनीय फर्म फक्त दोन ठिकाणी देण्यात आली होती केवळ उत्तरपत्रिकेचे आणि रेकॉर्ड ठेवण्याची जबाबदारी गोपनीय फर्मकडे होती. त्यावेळच्या गोपनीय कंपनीकडे स्कॅनरचे फक्त एक युनिट होते आणि चार ते सहा पंखे / टयुब लाईट वापरण्यात आले होते.

२) जानेवारी २०२३ मध्ये (नोव्हेंबर / डिसेंबर, २०२२ परीक्षा) PAHSUS चे मुख्य स्कॅनिंग केंद्र त्यांच्या संस्थेला देण्यात आले आहे ज्यासाठी सर्व वर्षे आणि सर्व विद्याशाखांचे स्कॅनिंग केंद्र देण्यात आलेले असून अंदाजे तीन लाख पन्नास हजार रुपये (₹३,५०,०००) संग्रहीत करण्याची जबाबदारी होती. तसेच उत्तरपत्रिकांचे रेकॉर्ड ठेवणे आणि सुरक्षा त्यांच्या संस्थेकडे आहे.

३) १५,००० हून अधिक उत्तरपत्रिका गोपनीय फर्मला पुन्हा देण्यात आलेल्या आहेत जी प्रक्रिया आजपर्यंत सुरु आहे.

४) २४ पंखे / २४ टयुबलाईट सहा मोठया खोल्या असलेल्या संपूर्ण मजल्यावर सुविधा देण्यात आली आहे.

५) चार संगणक आणि इंटरनेट पायाभूत सुविधा (इंटरनेट / स्विचेस / लॅपटॉपसाठी व्हायफाय रॉऊटार्स) इत्यादींनी सोय केली आहे.

६) इंटरनेटची सुविधा २०० एमबीपीएस ची सुविधा ३ महिन्यांसाठी देण्यात आलेली आहे.

७) २० पेक्षा जास्त स्कॅनर आणि २५ लॅपटॉप तीन महिने सतत वीज वापरत होते

८) १२५ केव्हीए चे जरनेटर देखील वीज गेल्यानंतर अनेकदा वापरले गेले आहे.

९) काही ठिकाणी नवीन सीसीटीव्ही कॅमेरे खरेदी केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| | १०) एका ठिकाणी दोन एअर कंडिशनिंग युनिटसची सोय करण्यात आली आहे जी सतत दिवसांतून १६ तासांपेक्षा कार्यरत आहेत.<br>११) गोपनीय फर्मला १८ संगणक टेबल विद्युत कनेक्शनसहीत देण्यात आलेले आहेत.<br>१२) पायाभूत सुविधा जसे की, टेबल ३०, खुर्च्या ५०, वॉटर कुलर ०२, स्टेशनरी यासाठी ₹२७,०००/- रुपये गोपनीय फर्म व स्कॅनिंग सेंटर साठी खर्च केले आहेत.<br>१३) गोपनीय फर्मचे ४० पेक्षा जास्त स्कॅनिंग सदस्य कार्यरत आहेत.<br>१४) सर्व स्थळांची हाऊसकिपींग करण्यात आलेली आहे.<br>१५) वातानुकूलित यंत्रणा बसविण्याचे काम केले आहे.<br>१६) आवश्यकतेनुसार विद्युतीकरण केलेले आहे.<br>१७) वीज पुरवठयावर लक्ष ठेवण्यासाठी पूर्ण इलेक्ट्रीशन २४ X ७ नियुक्त करण्यात आलेला होता.<br>१८) नोडल ऑफीसर आणि सहाय्यक नोडल ऑफीसर (लिपीक, शिपाई आणि सुरक्षा रक्षक) यांनी उत्तरपत्रिकांचे सुरक्षित कस्टडीत निरीक्षण केले आहे, त्याअनुषंगाने उत्तरपत्रिका, विद्यार्थी, परीक्षा केंद्राशी संबधित तक्रारी सांगितल्या आहेत.<br>१९) अनेक तक्रारी असलेल्या मूळ उत्तरपत्रिका (अंदाजे ५००) सीलबंद सादर करण्यासाठी संस्थेच्या खर्चावर आम्ही वैयक्तिकरीत्या संस्थेच्या खर्चातून विद्यापीठाला भेट दिली आहे.<br>२०) मे / जुन २०१९ च्या परीक्षेसाठी पायाभूत सुविधा, स्कॅनिंग स्थळांचा तीन वर्षांहून अधिक काळ वापर करण्यात आला आणि संस्थेने काहीही शुल्क घेतले नाही.<br>२१) यावेळीही असे दिसते की स्कॅनिंग पूर्ण झाल्यानंतर स्कॅनिंगची ठिकाण दोन महिने व्यापली जातील.<br>२२) नुकतीच ऑफलाईन तपासणीचीही जबाबदारीही त्यांच्याकडे देण्यात आलेली आहे.<br>त्यानुसार कर्तव्याच्या उददेशाने सदर संस्थेने विनंती केलेली आहे की, त्यांच्या संस्थेला प्रती उत्तरपत्रिका ₹७/- रुपये (प्रती पेपर सात रुपये) उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क संबंधित संस्थेला मंजूर करावे यामध्ये सर्व खर्च उदा. प्राध्यापक सदस्य / कर्मचाऱ्यांचे मानधन, लाईट बील, पायाभूत सुविधा, इंटरनेट, सर्व वाहतूक इत्यादींचा समावेश आहे हे सर्व संस्थेव्दारे व्यवस्थापीत केले जाईल असे कळविलेले होते त्यानुसार उपरोक्त सर्व संदर्भीय पत्रे व त्यामधील वस्तुस्थिती विचारात घेता मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग या संस्थेला त्यांच्या विनंतीनुसार प्रती उत्तरपत्रिका ₹७/- रुपये (प्रती पेपर सात रुपये) उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क देण्याबाबत मध्यवर्ती मूल्यमापन केंद्राने मा. कुलगुरु महोदया यांचेकडे संदर्भ क्र. ९ अन्वये टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर मा. संचालक, प.व.मू.मं. यांनी ₹७/- Per Ans Book असे पृष्टांकन केलेले आहे त्यास तत्कालीन मा. कुलगुरु महोदया यांनी मान्यता दिलेली होती.<br>सबब, उपरोक्त बाब विचारात घेता मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना त्यांच्या विनंतीनुसार ऑक्टोंबर/नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेतील प्रति उत्तरपत्रिकेसाठी ₹७/- प्रमाणे उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क आदा करण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **मुख्य स्कॅनिंग केंद्र एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना ऑक्टोबर / नोव्हेंबर, २०२२ च्या परीक्षेतील प्रति उत्तरपत्रिकेसाठी ₹७/- प्रमाणे उत्तरपत्रिका प्रक्रिया शुल्क अदा करण्यापूर्वी सदर केंद्रावरील सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या शिफारशीच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | समिती सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २. | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |
| ३. | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३३ ] | **सन २०२३-२४ मध्ये नवीन बजेट हेड तयार करुन अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली तरतूद करण्याची बाब विचारार्थ.** | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |

टिपणी: युवा संवाद-२०४७ चे आयोजन प्रस्तुत विद्यापीठामध्ये करण्यात यावे तरी सदरच्या युवा संवाद कार्यक्रमाकरिता ५०० मुले व ५०० मुली यांना सहभागी करून घेण्यात यावे व स्थानिक लोकप्रतिनिधी यांना सदरच्या युवा संवाद कार्यक्रमाकरिता आमंत्रित करून विद्यार्थ्यांशी युवा संवाद कार्यक्रमाचे आयोजन करावे असे क्षेत्रीय निदेशक (महाराष्ट्र एवं गोवा) क्षेत्रीय निदेशालय रासेयो, पुणे यांनी दि.०६/०२/२०२३ रोजीच्या ई-मेलव्दारे या विभागास कळविले आहे. तरी सदरचा युवा संवादाचे आयोजन करण्यासाठी व होणाऱ्या अनुषंगीक खर्चाकरिता अंदाजपत्रकीय तरतूद करावी लागणार आहे. तरी युवा संवाद २०४७ च्या आयोजनाकरिता खालीलप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

| अ. क्र | तपशील | अंदाजे रक्कम रू. | खर्च (अंदाजे) |
|---|---|---|---|
| १ | भोजन (११००X१८०) | प्रति ताट ₹१८०/- | ₹२,००,०००/- |
| २ | चहा (दोन वेळचा) (११००X२०) | प्रति कप ₹१०/- | ₹२२,०००/- |
| ३ | पाण्याचे जार (अंदाजे ६० नग) | प्रति नग ₹३०/- | ₹१,८००/- |
| ४ | ०१ नग बॅनर (८ बाय १२) | ₹२,५००/- | ₹२,५००/- |
| ५ | हॉल भाडे | ₹३०,०००/- | ₹३०,०००/- |
| ६ | शाल, बुके, हार व इतर किरकोळ साहित्य खरेदी | - | ₹१०,०००/- |
| | | **एकुण अंदाजे खर्च** | **₹२,६६,३००/-** |

सबब, युवा संवाद २०४७ च्या आयोजनाकरिता University own Contribution Yuva Samvaad Expenses या नावाने नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्यास व सदरच्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली अंदाजे ₹३,००,०००/- इतकी विद्यापीठ फंडातून तरतूद (Provision) करण्याची बाब विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | **सन २०२३-२४ मध्ये युवा संवाद २०४७ च्या आयोजनाकरिता University own Contribution Yuva Samvaad Expenses या नावाने नवीन अंदाजपत्रकीय शिर्षक उघडण्यास व सदरच्या अंदाजपत्रकीय शिर्षकाखाली अंदाजे ₹३,००,०००/- इतकी विद्यापीठ फंडातून तरतूद (Provision) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३४ ] | **NATIONAL INITTIATIVE FOR DEVELOPING AND HARNESSING INNOVATIONS (NIDHI) INCLUSIVE TBI (I TBI) मध्ये नवोपक्रम, नवसंशोधन साहचर्य मंडळ अतंर्गत इन्क्युबेशन सेंटरसाठी अर्ज करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: अंतर्गत विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST) द्वारे समर्पित शैक्षणिक संस्थांसाठी आहे त्यांना विद्यार्थी, प्राध्यापक, उद्योजक आणि जवळपासच्या समुदायांमध्ये नवकल्पना आणि उद्योजकता संस्कृती वाढवण्याची शक्यता आहे. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यामध्ये नाविन्यपूर्ण आणि उद्योजकता (I&E) ची भावना जागृत करणे, नाविन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन आणि समर्थन देणे, इनक्युबेशनद्वारे स्टार्ट-अप निर्मिती करणे हा आहे. iTBI चा परिणाम कल्पनांना स्टार्टअपमध्ये रुपांतरित करेल. iTBI (समावेशक TBI) देखील एक संस्कृती निर्माण करेल. होस्ट इन्स्टिअयूशन (HI) आणि जवळपासच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये नवकल्पना आणि उद्योजकता, iTBI कल्पनांना स्टार्टअपमध्ये रुपांतरित करण्यासाठी नवकल्पकांना अनुदान-इन-एड फंडिंग सहाय्याने सुसज्य असेल असे सांगितले आहे.<br>**i-TBI ची उद्दिष्टे**<br>१. विद्यार्थी आणि प्राध्यापकांसह शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण उद्योजकतेची संस्कृती निर्माण करण्यासाठी प्रामुख्याने तांत्रिक क्षेत्रातून संस्थाना प्रेरित करणे आणि प्रोत्साहन देणे.<br>२. विशेषत: ज्या प्रदेशामध्ये अपेक्षित नाविन्य आणि उद्योजकता इकोसिस्टम नाही अशा संस्थांवर लक्ष केंद्रित करणे.<br>३. स्टार्टअप संस्कृतीच्या निर्मितीकडे नेणारी, जवळच्या प्रदेशांमध्ये परिसंस्था तयार करणे, शैक्षणिक संस्था, गुंतवणूकदार, मार्गदर्शक, उद्योग आणि इतर संस्था नाविन्यपूर्ण कल्पनांना अनुदान-सहाय्य प्रदान करणे आणि त्यांचे प्रोटोटाइपमध्ये आणि पुढे स्टार्टअप्समध्ये रुपांतरित करणे.<br>मा. कुलगुरु महोदयांनी iTBI साठी अर्ज करण्याकरिता मान्यता दिलेली आहे. वरील प्रस्ताव हा रुपये ५ करोड ३७ लाख ५० हजार इतका असून त्यातील रुपये ५ करोड ही रक्कम विज्ञान व तंत्रज्ञान विभाग (DST), भारत सरकार देणार असून रुपये ३७ लाख ५० हजार ही रक्कम विद्यापीठाला देणे अनिवार्य आहे. | नवोपक्रम नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | NATIONAL INITTIATIVE FOR DEVELOPING AND HARNESSING INNOVATIONS (NIDHI) INCLUSIVE TBI (I TBI) मध्ये नवोपक्रम, नवसंशोधन **साहचर्य मंडळ अतंर्गत इन्क्युबेशन सेंटरसाठी अर्ज करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(१)] | प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ/पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ/क्रीडा महोत्सव/खेलो इंडिया या विविध स्पर्धेत सहभागी होत असतात. सदर स्पर्धेकरिता संघव्यवस्थापक/प्रशिक्षक यांना देण्यात येणारी तसलमात (अग्रीम) रक्कम जमा करण्याची मुदत ७ दिवसाऐवजी १५ दिवस वाढून मिळण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: क्रीडा व शारिरीक शिक्षण मंडळाच्या दि.२७/०४/२०२३ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेचा विषय क्र.५(२) अन्वये प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय स्पर्धेकरिता आंतरविद्यापीठ / क्रीडा महोत्सव / खेलो इंडिया या विविध स्पर्धेत सहभागी होत असतात. सदर स्पर्धेकरिता संघव्यवस्थापक / प्रशिक्षक यांना देण्यात येणारी तसलमात (अग्रीम) रक्कम जमा करण्याची मुदत ७ दिवसाऐवजी १५ दिवस वाढून मिळण्याबाबत खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.<br>ठराव: प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ / क्रीडा महोत्सव / खेलो इंडिया या विविध स्पर्धेत सहभागी होत असतात. सदर स्पर्धेकरिता संघव्यवस्थापक / प्रशिक्षक यांना देण्यात येणारी तसलमात (अग्रीम) रक्कम जमा करण्याची मुदत ७ दिवसाऐवजी १५ दिवस इतकी वाढविण्याची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ / क्रीडा महोत्सव / खेलो इंडिया या विविध स्पर्धेत सहभागी होत असतात. सदर स्पर्धेकरिता संघव्यवस्थापक / प्रशिक्षक यांना देण्यात येणारी तसलमात (अग्रीम) रक्कम जमा करण्याची मुदत ७ दिवसाऐवजी १५ दिवस वाढून मिळण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारिरीक शिक्षण विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठातील खेळाडू अखिल भारतीय आंतरविद्यापीठ/पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ/क्रीडा महोत्सव/खेलो इंडिया या विविध स्पर्धेकरिता संघ व्यवस्थापक/प्रशिक्षक यांना देण्यात येणाऱ्या तसलमात (अग्रीम) रक्कमेचे समान लेखा संहिता (Common Account Code) नुसार एक महिन्यांच्या आत समायोजन करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. त्याचप्रमाणे तसलमात रक्कमेतून शिल्लक राहिलेली रोख रक्कम ७ दिवसात जमा करण्यात यावी. तसेच एक महिन्यांच्या आत सदर रकमेचे समायोजन न केल्यास १२% दराने व्याज आकारण्यात यावे असे ही सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(२)] | **मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे लवकरात लवकर स्कॅनिंग काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने स्कॅनिंगचे काम करणाऱ्या एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग सेंटरसाठी त्यांच्या मागणीनुसार व वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे खालील अंदाजे होणाऱ्या खर्चास व आवश्यक त्या सोईसुविधा अभियांत्रिकी विभागाकडून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.** | परीक्षा व मुल्यमापन मंडळ |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचे मा. प्रभारी कुलगुरु महोदय, मा. प्र. कुलगुरु महोदय, मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग केंद्रास भेट दिली असता त्यांच्यात व कंपनी प्रतिनिधी यांच्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर स्कॅनिंगचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने स्कॅनिंगचे दोन विभाग करुन सदर एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग सेंटरसाठी आवश्यक त्या सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याचे वरिष्ठांनी निर्देश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने एन.बी.नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव यांना सादर करण्यात आलेल्या सोबत जोडलेल्या १०G Telecom Pvt Ltd. Pune यांचे दि.१९/६/२०२३ रोजीचे Wireline Solutions संदर्भातील पत्र जोडले असून त्यामध्ये खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

Last Mile : OFC / RF
BW - Mbps 1:1 ILL with unlimited upload and download
WAN IP - /30
Statically routed + IPv6 will be allocated as required
CPE - CPE to be provided and managed by - N B Navale Sinhgad College of Engg.
Interface Handoff - Ethernet Interface towards CPE router - Sinhgad College
Delivery Time - 1 Week

| Sr. No. | Bandwidth | Quarterly Charges | One Time Charges | Contract Period | Last Mile | Payment Terms |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 500 Mbps ILL | Rs. 3,10,000/- | Rs. 10,000/- | 1 Year | OFC | Quarterly Advance |

**Note -** Just to inform you that delivery / Installation will take maximum ie 3 Days after complete documentation process.
Above commercials are valid only for next 10 working days & subjected to feasibility & price approval
Taxes are extra as per applicable.
Will provide you testing on single PC post that you have to configure the link.
Building permission for installation would be at your end.

त्यासोबतच स्पलॅशगेन टेक्नॉलॉजी प्रा. लि. कंपनीचा Infrastructure बाबतचा संदर्भीय ई-मेल प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये सदर फर्मने खालील बाबी नमूद केलेल्या आहेत.

a) CCTV Cameras should be installed in the scanning room.
b) AC should be available in the scanning room. (If we turn on the wall fan we cant scan the booklet properly. Due to the SMPS heat issue, we required AC instead of a fan.)
c) Stable internet connection should be available in the scanning machine with a minimum 100 MBPS Speed. If any firewall is set for the institute premises we need to whitelist the scanning machines IP as well as port number 21.
d) System / Desktop minimum configuration should be as follows: (i) I5 6th generation ii) 8 GB ram iii) Minimum of 4 USB ports should be available. Iv)

Operating System - Windows 7/10

e) Generator / inverter connection should be available in the scanning room (In case of a power cut issue.)

f) Scanning room should be available for resolving the queries while the scanning activities.

h) Proper arrangement for setting up (Tables) the local machine as well as scanners.

f) Electric switch board should be available for with extra two ports.

स्कॅनिंग सेंटरसाठी ऑक्टों / नोव्हें २०२२ च्या परीक्षेवेळी २०० MBPS ILL Internet सुविधा दिलेली होती. सदर स्प्लॅशगेन कंपनीने ५०० MBPS ची मागणी केली आहे. याबाबत सिंहगड संस्थेने त्यांच्या कामासाठी ५०० MBPS Band width साठी केलेल्या खर्चानुसार Quarterly (३ महिन्यासाठी) ३,१०,०००/- रुपये खर्च झालेला आहे. त्याच फर्मकडून काम करुन घेतल्यास अंदाजे जवळपास तेवढाच खर्च येण्याची शक्यता आहे.

सबब, सिंहगड संस्थेतील विद्यापीठ स्कॅनिंग सेंटरसाठी त्यांच्या मागणीनुसार व वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंगचे काम लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने वरीलप्रमाणे अंदाजे होणाऱ्या खर्चास व आवश्यक त्या सोईसुविधा अभियांत्रिकी विभागाकडून उपलब्ध करुन देण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **मार्च / एप्रिल २०२३ च्या परीक्षेतील उत्तरपत्रिकांचे लवकरात लवकर स्कॅनिंग काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने स्कॅनिंगचे काम करणाऱ्या एन. बी. नवले सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनियरींग, केगांव येथील स्कॅनिंग सेंटरसाठी त्यांच्या मागणीनुसार व वरिष्ठांच्या निर्देशाप्रमाणे अंदाजे होणाऱ्या खर्चास व आवश्यक त्या सोईसुविधा इ. सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. सदर समितीच्या शिफारशीच्या अधिन राहून पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | समिती सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | अध्यक्ष |
| २. | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य |
| ३. | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[३५(३)]</td><td>

**Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकाच्या पुनर्विनियोजन (Reappropriation) करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: सामाजिकशास्त्रे संकुलातील सन २०२२-२३ या वर्षाच्या अंदाजपत्रकात Archaeological Museum या अंदाजपत्रकिय लेखा शिर्षकात रक्कम ₹२,००,०००/- इतकी तरतुद करण्यात आली आहे. जुन्नर येथे उभारण्यात आलेल्या Archaeological Museum and Interpretation Center चे काम पूर्णत्वास आलेले आहे.

सदरील कामावर नेमण्यात आलेल्या Architect ची फीस अदा करण्याकरीता RUSA Project या Budget Head मधून देण्यास RUSA ने नकार कळविला आहे. सदरील Architect ची फीस ही विद्यापीठ फंडातील सामाजिकशास्त्रे संकुलातील Archaeological Museum अंदाजपत्रकीय शिर्षकातुन देण्यत येणार होती, परंतु सदरील शिर्षकातील रक्कम पुरेशी नसल्यामुळे त्याअनुषंगाने सदर अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकाचे पुनर्विनियोजन करणे आवश्यक आहे.

सदरील Architect चे देयक अदा करण्याकरिता सामाजिकशास्त्रे संकुलातील Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकातील रक्कम पुरेशी नसल्याने Excavation Programme या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकातील रक्कम ₹५०,०००/- इतकी रक्कम Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकात वर्ग करण्यास मान्यता असावी.

<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Archaeological Museum</th><th>Provission Rs.</th><th>Expenditure Made Rs.</th><th>Reappropriation Amount.</th><th>Revised Budget</th></tr>
<tr><td>1</td><td>Archaeological Museum</td><td>₹2,00,000/-</td><td>Nill</td><td>+ ₹50,000/-</td><td>₹2,50,000/-</td></tr>
<tr><td>2</td><td>Excavation Programme</td><td>₹2,00,000/-</td><td>Nill</td><td>- ₹50,000/-</td><td>₹1,50,000/-</td></tr>
</table>

सबब, वरील तक्त्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे Excavation Programme या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकातुन एकुण ₹५०,०००/- इतकी रक्कम Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकात वर्ग करुन Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकाच तरतूदीचे पुनर्विनियोजन (Reappropriation) करण्याची बाब विचारार्थ.

</td><td>सामाजिकशास्त्र संकुल</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>

**Excavation Programme या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षकातुन एकुण ₹५०,०००/- इतकी रक्कम Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखाशिर्षकात वर्ग करुन Archaeological Museum या अंदाजपत्रकीय लेखा शिर्षक तरतूदीचे पुनर्विनियोजन (Reappropriation) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(४)] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व TeamLease Edtech Limited, Mumbai यांचे बरोबर Apprenticeship Programs साठी M. Sc. Computer Science, MCA, M. Com & MBA या अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसुदा विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |

टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व TeamLease Edtech Limited, Mumbai यांच्या मध्ये Apprenticeship Programs साठी M.Sc. Computer Science, MCA, M. Com आणि MBA या अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य कराराचा मसुदा सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. सदर सामंजस्य कराराच्या मसुद्याचे अवलोकन केले असता Annexure A नुसार संबंधित फर्म ने विद्यार्थ्यांसाठी आकारण्यात येण्याऱ्या शुल्काचा तक्ता खालील प्रमाणे कळविला आहे

| Courses | Apprenticeship Fees in INR |
|---|---|
| Degree Apprenticeship in Master of Commerce (M. Com) | १०००० (Including GST) Per Student Per Year |
| Degree Apprenticeship in Master of Science (Computer Science) | १०००० (Including GST) Per Student Per Year |
| Degree Apprenticeship in MCA | १०००० (Including GST) Per Student Per Year |
| Degree Apprenticeship in MBA | १०००० (Including GST) Per Student Per Year |

Note: Any other value-added facilities/services without damaging the agreed upon quality and content of the original shall be purely optional for the students. Such fees will be charged directly by the Technology Service Provider and the University will not be eligible for a revenue share in the same.

उपरोक्त शुल्काचा तक्ता व सामंजस्य कराराचा मसुदा सोबत जोडला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व TeamLease Edtech Limited, Mumbai यांचे बरोबर Apprenticeship Programs साठी M. Sc. Computer Science, MCA, M. Com & MBA या अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य कराराचा मसुदा सामंजस्य करार करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

| | | |
|---|---|---|
| ठराव: | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ व TeamLease Edtech Limited, Mumbai यांचे बरोबर Apprenticeship Programs साठी M.Sc. Computer Science, MCA, M. Com & MBA या अभ्यासक्रमांसाठी सामंजस्य करार करण्यास व सामंजस्य कराराच्या मसुद्यास BoD च्या वतीने मा. प्र-कुलगुरुंनी (Pro.VC) केलेल्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(५)] | **आषाढी वारीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने वैद्यकिय शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी: महाराष्ट्राच्या अस्मितेमध्ये पंढरीच्या वारीचे महत्व अनन्यसाधारण आहे. लाखो भाविक या वारीसाठी शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास करून पंढरीच्य विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. या वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा असे मानून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम व शिबीरांचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. या वर्षी प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने वैद्यकीय शिबीर जिल्ह्यातील अकलूज, माळशिरस, वेळापूर आणि वाखरी या ठिकाणी ४०० वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी आणि ३० डॉक्टर यांच्या माध्यमातून दिवसाला १००० अशा प्रकारे ४ दिवस वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार शिबीर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे आयोजित करण्यात आली आहे. सदरच्या वैद्यकीय शिबीरासाठी लागणारे औषधे व इतर आवश्यक साहित्य खरेदी करण्यात आले असून त्यासाठी अंदाजे रक्कम रू.५०,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.<br>सबब, आषाढी वारीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आल्याची बाब माहितीस्तव. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **आषाढी वारीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आल्याबाबतची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(६)] | **मा. कुलगुरु यांनी दि.२३/०६/२०२३ रोजी केलेल्या आदेशानुसार कायदा विभागाकडून माहे मे, २०२३ चे न्यायालयीन प्रकरणाचा अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: कायदा विभागाकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार विद्यापीठाच्या वतीने अथवा विद्यापीठ विरुध्द विविध न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विविध न्यायलयीन प्रकरणाचा Monthly Report प्रस्तुत विभागामार्फत मा. कुलगुरु यांच्याकडे सादर करण्यात येतो. त्यानुसार माहे मे, २०२३ चा अहवाल सादर करण्यात आले असता, त्यावर मा. कुलगुरु यांनी व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सदरचा अहवाल सादर करण्याबाबतचा शेरा दिलेला आहे.<br>सबब, मा. कुलगुरु यांनी दि.२३/०६/२०२३ रोजी केलेल्या आदेशानुसार कायदा विभागाकडून माहे मे, २०२३ चे न्यायालयीन प्रकरणाचा अहवाल विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ कायदा विभागाकडून वकील नेमण्याबाबतची सर्व माहिती, यांची नावे, मानधन, दिलेले केसेस, पॅनल व्यतिरिक्त नेमलेले वकील इत्यादी माहिती व्यवस्थापन परिषदेच्या समोर सादर करावी असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(७)] | **विद्यापीठ परिसरात सीसीटीव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: विद्यापीठ परिसरात मुख्य प्रशासकीय इमारत व विविध संकुलामध्ये सद्यस्थितीत सीसीटीव्ही वापरात आहेत. सर्व इमारती व परिसरामध्ये एकच सीसीटीव्ही प्रणाली अस्तित्वात असणे आवश्यक असून त्यासाठी धोरण निश्चित करावे लागणार आहे.<br>सबब, विद्यापीठ परिसरात सीसीटीव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **सर्व संवैधानिक अधिकारी यांच्या कक्षेतील सीसीटीव्ही कॅमेरांचा Screen View बंद करणे व विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी सीसीटीव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करण्याबाबत समिती गठीत करण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरु महोदय यांना सर्वानुमते देण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [३५(८)] | मा. राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य श्री. देवानंद चिलवंत यांनी केलेल्या विनंतीनुसार, विद्यापीठात वारकरी संप्रदायाचे अभ्यासकेंद्र स्थापन करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: संपूर्ण महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाची फार मोठी परंपरा राहिली आहे. भारतीय परंपरा, संस्कृती जोपासणाऱ्या पंढरपूर वारीची किर्ती जगभरात असून यावर अधिक अभ्यास व संशोधन करण्याच्या उद्देशाने विद्यापीठात वारकरी संप्रदायाचे अभ्यासकेंद्र उभारण्यात यावे असा प्रस्ताव सादर केला. मा. कुलगुरुंनी वारंकरी संप्रदायाचे अभ्यासकेंद्रची गरज व आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. मा. कुलगुरुंनी या अनुषंगाने प्रभारी कुलगुरु म्हणून कार्यभार स्विकारल्यानंतर पंढरपूर, अक्कलकोट इत्यादी भागांची स्वत: पाहणी करुन तत्सम घटकाशी चर्चा केली आहे. | आस्थापना विभाग |
| ठराव: | वारकरी संप्रदाय अभ्यासकेंद्र विद्यापीठात स्थापन करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [३५(९)] | उपसचिव महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्रं.संकीर्ण २०२०/प्र.क्र.२३९/२०/वि.शि-१, दि.१४/०६/२०२३ च्या पत्रानुसार विद्यापीठ सेवेतून एकतर्फी कमी केलेल्या रविंद्र महादेव कोरे, रेकॉर्डकीपर-नि-लिपिक यांच्या समकक्ष पदावरील समावेशनाबाबत विहीत कार्यपध्दती व नियमातील तरतूदींचा विचार करुन निर्णय घेण्याबाबत केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | उपसचिव महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्रं.संकीर्ण २०२०/प्र.क्र.२३९/२०/वि.शि-१, दि.१४/०६/२०२३ च्या पत्रानुसार निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतचे सर्वाधिकार मा. कुलगुरुमहोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले | |

मा. प्रभारी कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

४.७.२३
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद